# राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेच्या मार्गदर्शक सूचना (२०२४-२५)

प्रती,

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त (सर्व)

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व)

**विषय** - राजे यशवंतराव होळकर महामेष योजना सन २०२४-२५ मध्ये राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना

**संदर्भ**- 1. शासन निर्णय क्रमांक – पविआ-१०१७/प्र. क्र. ६५/पदुम-३ दिनांक ०२/०६/२०१७

2. शासन निर्णय क्रमांक – पविआ- २०२४ /प्र. क्र. ०३ /पदु-३ दिनांक ०५/०८/२०२४

**जावक क्रमांक** - पुअममेवशेविमपु/तांत्रिक/महामेष/ मार्गदर्शक सूचना/१००२/२०२४, दिनांक०६/०८/२०२४

उपरोक्त विषय व संदर्भीय शासन निर्णयास अनुसरून, राजे यशवंतराव होळकर महामेष योजना या नावाने ६ मुख्य घटकासह नवीन योजना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरित ३४ जिल्ह्यात राबविणेकरिता शासन निर्णय क्रमांक - पविआ-१०१७/प्र.क्र. ६५/पदुम-३ दिनांक ०२/०६/२०१७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच शासन निर्णय क्रमांक पविआ- २०२४ /प्र. क्र. ०३ /पदु-३ दिनांक ०५/०८/२०२४ अन्वये सदर योजना राज्यामध्ये यापुढे चालू ठेवण्यास शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे. राजे यशवंतराव होळकर महामेष योजना राबविणेकरिता महामंडळाकडे रु. २९.५५ कोटी निधी उपलब्ध आहे. यास अनुसरून सदर योजना राज्यात सन २०२४-२५ मध्ये राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना याद्वारे निर्गमित करण्यात येत आहे.

सदर योजना केवळ भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील लाभार्थ्यांना लागू असून या योजनेमध्ये खालील घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे भौतिक उधीष्टे व त्यानुसार उपलब्ध तरतुदी बाबतची माहिती खालील तक्त्यामध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

| घटक क्र. | घटकाचे नाव | गटाची एकूण किंमत (रु.) | लाभधारक हिस्सा २५% (रु.) | शासन अनुदान ७५% (रु) | उदिष्ट (लाभधारक संख्या) | एकूण शासन अनुदान |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कायमस्वरूपी एका ठिकाणी राहून मेंढीपालन करण्याकरिता पायाभूत सोई -सुविधेसह २० मेंढया + १ मेंढानर असा मेंढीगट ७५% अनुदानावर वाटप करणे (स्थायी) | 333000 | 83250 | 249750 | 550 | 137362500 |
| 2 | स्थलांतर पद्धतीने मेंढीपालन करण्याकरिता पायाभूत सोई – सुविधेसह २० मेंढया + १ मेंढानर असा मेंढीगट ७५% अनुदानावर वाटप करणे (स्थलांतरीत) | 202500 | 50625 | 151875 | 550 | 83531250 |
| 3 | ज्यांच्याकडे स्वत:चे २० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० पेक्षा कमी मेंढया आहेत अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा १ नरमेंढा ७५% अनुदानावर वाटप करणे. | 10000 | 2500 | 7500 | 100 | 750000 |
| 4 | ज्यांच्याकडे स्वत:चे ४० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ६० पेक्षा कमी मेंढया आहेत अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचे २ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. | 20000 | 5000 | 15000 | 100 | 1500000 |
| 5 | ज्यांच्याकडे स्वत:चे ६० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ८० पेक्षा कमी मेंढया आहेत अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचे ३ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. | 30000 | 7500 | 22500 | 100 | 2250000 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 6 | ज्यांच्याकडे स्वत:चे ८० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु १०० पेक्षा कमी मेंढया आहेत अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचे ४ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. | 40000 | 10000 | 30000 | 100 | 3000000 |
| 7 | ज्यांच्याकडे स्वत:चे १०० किंवा त्यापेक्षा अधिक मेंढया आहेत अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचे ५ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. | 50000 | 12500 | 37500 | 100 | 3750000 |
| 8 | ज्यांच्याकडे स्वत: च्या २० मेंढया व १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० मेंढ्यापेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थायी) | 163000 | 40750 | 122250 | 100 | 12225000 |
| 9 | ज्यांच्याकडे स्वत: च्या २० मेंढया व १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० मेंढ्यापेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या स्थलांतरीत स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थलांतरीत) | 32500 | 8125 | 24375 | 100 | 2437500 |
| 10 | ज्यांच्याकडे स्वत: च्या ४० मेंढया व २ मेंढानर अशा एकूण ४२ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक अशा मेंढ्यांच्या एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थायी) | 317000 | 79250 | 237750 | 100 | 23775000 |
| 11 | ज्यांच्याकडे स्वत: च्या ४० मेंढया व २ मेंढानर अशा एकूण ४२ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक अशा मेंढ्यांच्या स्थलांतरीत स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थलांतरीत) | 48000 | 12000 | 36000 | 100 | 3600000 |
| 12 | एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थायी) (१०० ग्रॅम प्रती दिन प्रती मेंढी याप्रमाणे माहे एप्रिल ते जुलै या ४ महिन्याच्या कालावधी करिता) (सरासरी ५० मेंढ्या प्रती लाभधारक) | 15000 | 3750 | 11250 | 100 | 1125000 |
| 13 | भटकंती करणारे स्थलांतरीत स्वरूपाच्या मेंढी पालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थलांतरीत) (१०० ग्रॅम प्रती दिन प्रती मेंढी याप्रमाणे जून ते जुलै या २ महिन्याच्या कालावधी करिता ) (सरासरी ५० मेंढ्या प्रती लाभधारक) | 7500 | 1875 | 5625 | 100 | 562500 |
| 14 | कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्याचा मुरघास करण्याकरिता गासड्या बांधण्याचे यंत्र (Mini Silage Baler Cum Wrapper) खरेदी करण्यासाठी ५०% अनुदान वाटप | 800000 | 400000 | 400000 | 20 | 8000000 |
| 15 | पशुखाद्य कारखाने उभारण्यासाठी ५०% अनुदान वाटप | 1000000 | 500000 | 500000 | 20 | 10000000 |
| | एकूण | | | | 2240 | 293868750 |

*(वरील घटकांमध्ये समाविष्ट असलेल्या बाबींची माहिती सोबत जोडण्यात आलेल्या विवरणपत्र- अ ते क मध्ये नमूद करण्यात आलेली आहे.)*

२. योजना राबविण्याचे कार्यक्षेत्र

१. सदर योजना केवळ भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील लाभार्थीसाठी लागू राहील.

२. सदरची योजना राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरित ३४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात यावी.

३. योजनेअंतर्गत जिल्हा निहाय लाभधारक निवड करतांना संबंधीत जिल्ह्याची मेंढ्यांची संख्या विचारात घेऊन त्यानुसार त्या जिल्ह्यातील लाभधारक निवडीचे उद्धिष्ट सोबत जोडण्यात आलेल्या **परिशिष्ट- अ** नुसार निश्चित करण्यात आलेली आहे. त्यानुसार संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी त्यांच्या जिल्ह्यामधील तालुक्याचे भौतिक उद्दिष्ट निश्चित करण्यात यावे. त्यानुसार संबंधित क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी लाभार्थी निवडीची कार्यवाही करावी.

३. **लाभार्थी निवडीचे निकष/ अटी व शर्ती**

१. सदर योजना केवळ भटक्या जमाती (भज-क) या प्रवर्गातील लाभार्थ्यांना लागू असेल.

२. लाभधारकाचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ६० वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. लाभधारकांची निवड करताना, महिलांकरिता ३०% व अपंगांकरिता ३% आरक्षण देण्यात यावे.

४. या योजने अंतर्गत भटक्या जमाती (भज - क) प्रवर्गातील बचत गटांना / पशुपालक उत्पादक कंपन्याना लाभार्थी म्हणून प्राधान्य देण्यात येईल.

५. लाभार्थ्यास आधार कार्ड सोबत संलग्न करण्यात यावे.

६. ज्या लाभधारकांना किंवा कुटुंबातील व्यक्तीस या आधी महामेष योजनेअंतर्गत लाभ मिळालेला आहे अशा लाभधारकांना यामध्ये पुन्हा अर्ज करता येणार नाही.

७. पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत गेल्या ३ वर्षामध्ये लाभघेतलेल्या व्यक्तीस किंवा कुटुंबातील व्यक्तीस या योजने अंतर्गत पुन्हा अर्ज करता येणार नाही.

८. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस अर्ज करता येईल.

९. स्थायी पद्धतीने मेंढी पालन करणाऱ्या लाभार्थ्यांना शेड बांधण्याकरिता स्वत: ची जागा असणे आवश्यक आहे.

८. अर्जदार किंवा अर्जदाराच्या कुटुंबातील सदस्य शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवा निवृत्ती वेतनधारक / शासकीय पदाचा लाभ घेणारा, तसेच राज्य, केंद्र शासन / स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य / पदाधिकारी/ लोकप्रतींनिधी नसावा.

४. लाभार्थी निवड -

- लाभार्थी निवड समितीमार्फत पात्र अर्जामधून पुढील प्रतीक्षा यादी तयार करून सदरची लाभार्थी यादी पुढील पाच वर्ष ग्राह्य धरण्यात येईल. तसेच शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीस आधीन राहून त्यानुसार दरवर्षी अर्ज मागवून प्रतीक्षा यादी तयार करण्यात येईल.
- महामंडळामार्फत सदर योजनेची राज्यस्तरीय वृत्तपत्रातून प्रसिद्धी करण्यात येईल.
- सदर योजनेअंतर्गत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविणे, लाभधारक निवड समितीमार्फत अर्जाची छाननी व निवड करणे या करिता महामंडळामार्फत Web / Android Application उपलब्ध करून देण्यात यावे.
- त्यानंतर १५ दिवस मुदतीचा कालावधी देऊन ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात यावे.

- ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेल्या अर्जाची जिल्हा निवड समिती मार्फत प्राथमिक लाभधारक निवड (Randomization) करण्यात यावी.
- प्राथमिक निवड (Randomization) झालेल्या लाभधारकांकडून ऑनलाईन पद्धतीने कागदपत्रे अपलोड करून घ्यावी.
- संबंधीत तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी प्राथमिक निवड झालेल्या लाभधारकांकडून अपलोड केलेल्या कागदपत्रांची ऑनलाईन पद्धतीने छाननी करण्यात यावी.
- संबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांच्याकडून प्राप्त झालेल्या कागदपत्रांची ऑनलाईन पद्धतीने छाननी करावी.
- जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेकडून जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्याकडे प्राप्त झालेल्या कागदपत्राची जिल्हा निवड समितीमार्फत छाननी करून लाभार्थ्यांची प्रत्येक घटक निहाय निवड यादी एकास दहा (1 + 10 Waiting) या प्रमाणे अंतिम करून त्यास स्थानिक प्रसिद्धी द्यावी.
- जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे स्तरावरून निवड झालेल्या लाभधारकांना लाभ देण्याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात यावी.

## ५. घटकनिहाय आवश्यक कागदपत्रे –

प्राथमिक निवड (Randomization) झालेल्या लाभधारकांना (1 Selected + 10 Waiting) घटकनिहाय खालील कागदपत्रे ऑनलाईन पद्धतीने अपलोड करावी लागेल.

| घटक क्र. | योजनेचे घटक | आवश्यक कागदपत्रांचा तपशील |
|---|---|---|
| १ | कायमस्वरूपी एका ठिकाणी राहून मेंढीपालन करण्याकरिता पायाभूत सोई-सुविधेसह २० मेंढया + १ मेंढानर असा मेंढीगट ७५% अनुदानावर वाटप करणे (स्थायी) | 1) जातीचा दाखला **(सक्षम प्राधिकाऱ्याचा)**<br>2) आधार कार्ड<br>3) रेशन कार्ड<br>4) बँक पासबुक<br>5) मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र **(बंधपत्र नमुना क्र. १ नुसार)**<br>6) अपत्य स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. २ नुसार)**<br>7) शेड बांधकामासाठी स्वत:ची किमान १ गुंठा जागा उपलब्ध असल्याबाबत ७/१२ उतारा किंवा मिळकत प्रमाणपत्र<br>8) वैरण उत्पादनाकरीता किमान १ एकर जागा उपलब्ध असल्याबाबतचा पुरावा खालील प्रमाणे,<br>◆ स्वत:चे नावे जमीन असल्यास जमिनीचा ७/१२ उतारा **किंवा**<br>◆ अर्जदाराच्या नावे जमीन नसल्यास (कुटुंबीयांपैकी) संमतीपत्र देणाऱ्या व्यक्तीच्या नावाच्या शेतजमिनीचा ७/१२ उतारा व रु. १००/- रुपयाच्या मुद्रांकावर नोटरी करून संमतीपत्र **(बंधपत्र नमुना क्र. ३ नुसार)** |

| | | |
|---|---|---|
| | | **किंवा**<br>◆ अर्जदाराने भाडे तत्वावर शेतजमीन घेतली असल्यास शेतजमीन मालकासोबत केलेल्या भाडेकराराची सत्यप्रत रु. १००/- च्या मुद्रांकावर नोटरी करून(बंधपत्र नमुना क्र. ४ नुसार)<br>9) स्वयंघोषणा पत्र (**बंधपत्र नमुना क्र. ५**)<br>10) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| २ | स्थलांतर पद्धतीने मेंढीपालन करण्याकरिता पायाभूत सोई-सुविधेसह २० मेंढया + १ मेंढानर असा मेंढीगट ७५% अनुदानावर वाटप करणे (स्थलांतरीत) | 1) जातीचा दाखला (**सक्षम प्राधिकाऱ्याचा**)<br>2) आधार कार्ड<br>3) रेशन कार्ड<br>4) बँक पासबुक<br>5) मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र (**बंधपत्र नमुना क्र. १ नुसार**)<br>6) अपत्य स्वयंघोषणा पत्र (**बंधपत्र नमुना क्र. २ नुसार**)<br>7) स्वयंघोषणा पत्र (**बंधपत्र नमुना क्र. ५**)<br>8) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| ३ | ज्यांच्याकडे स्वत: च्या २० मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० पेक्षा कमी मेंढ्या आहेत अशा लाभार्थींना सुधारित प्रजातीचा १ नरमेंढा ७५% अनुदानावर वाटप करणे | 1) जातीचा दाखला (**सक्षम प्राधिकाऱ्याचा**)<br>2) आधार कार्ड<br>3) रेशन कार्ड<br>4) बँक पासबुक<br>5) मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र (**बंधपत्र नमुना क्र. १ नुसार**)<br>6) अपत्य स्वयंघोषणा पत्र (**बंधपत्र नमुना क्र. २ नुसार**)<br>7) स्वयंघोषणा पत्र (**बंधपत्र नमुना क्र. ५**)<br>8) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| ४ | ज्यांच्याकडे स्वत: च्या ४० मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ६० पेक्षा कमी मेंढ्या आहेत अशा लाभार्थींना सुधारित प्रजातीचा २ नरमेंढा ७५% अनुदानावर वाटप करणे | 1) जातीचा दाखला (सक्षम प्राधिकाऱ्याचा)<br>2) आधार कार्ड<br>3) रेशन कार्ड<br>4) बँक पासबुक<br>5) मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र (बंधपत्र नमुना क्र. १ नुसार)<br>6) अपत्य स्वयंघोषणा पत्र (बंधपत्र नमुना क्र. २ नुसार)<br>7) स्वयंघोषणा पत्र (बंधपत्र नमुना क्र. ५)<br>8) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| ५ | ज्यांच्याकडे स्वत: च्या ६० मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ८० पेक्षा कमी मेंढ्या आहेत अशा लाभार्थींना सुधारित प्रजातीचा ३ नरमेंढा ७५% अनुदानावर वाटप करणे | 1) जातीचा दाखला (**सक्षम प्राधिकाऱ्याचा**)<br>2) आधार कार्ड<br>3) रेशन कार्ड<br>4) बँक पासबुक<br>5) मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास |

| | | |
|---|---|---|
| | | अधिकारी यांचे प्रमाणपत्र **(बंधपत्र नमुना क्र. १ नुसार)**<br>6) अपत्य स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. २ नुसार)**<br>7) स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. ५)**<br>8) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| ६ | ज्यांच्याकडे स्वत: च्या ८० मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु १०० पेक्षा कमी मेंढ्या आहेत अशा लाभार्थींना सुधारित प्रजातीचा ४ नरमेंढा ७५% अनुदानावर वाटप करणे | 1) जातीचा दाखला **(सक्षम प्राधिकाऱ्याचा)**<br>2) आधार कार्ड<br>3) रेशन कार्ड<br>4) बँक पासबुक<br>5) मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र **(बंधपत्र नमुना क्र. १ नुसार)**<br>6) अपत्य स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. २ नुसार)**<br>7) स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. ५)**<br>8) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| ७ | ज्यांच्याकडे स्वत: च्या १०० मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक मेंढ्या आहेत अशा लाभार्थींना सुधारित प्रजातीचा ५ नरमेंढा ७५% अनुदानावर वाटप करणे | 1) जातीचा दाखला (सक्षम प्राधिकाऱ्याचा)<br>2) आधार कार्ड<br>3) रेशन कार्ड<br>4) बँक पासबुक<br>5) मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र **(बंधपत्र नमुना क्र. १ नुसार)**<br>6) अपत्य स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. २ नुसार)**<br>7) स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. ५)**<br>8) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| ८ | ज्यांच्याकडे स्वत: च्या २० मेंढया व १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० मेंढ्यापेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थायी) | 1) जातीचा दाखला (सक्षम प्राधिकाऱ्याचा)<br>2) आधार कार्ड<br>3) रेशन कार्ड<br>4) बँक पासबुक<br>5) मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र **(बंधपत्र नमुना क्र. १ नुसार)**<br>6) अपत्य स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. २ नुसार)**<br>7) शेड बांधकामासाठी स्वत:ची किमान १ गुंठा जागा उपलब्ध असल्याबाबत ७/१२ उतारा किंवा मिळकत प्रमाणपत्र<br>8) वैरण उत्पादनाकरीता किमान १ एकर जागा उपलब्ध असल्याबाबतचा पुरावा खालील प्रमाणे,<br>स्वत:चे नावे जमीन असल्यास जमिनीचा ७/१२ उतारा<br>**किंवा**<br>अर्जदाराच्या नावे जमीन नसल्यास (कुटुंबीयांपैकी) संमतीपत्र देणाऱ्या व्यक्तीच्या नावाच्या शेतजमिनीचा ७/१२ उतारा व रु. १००/- रुपयाच्या मुद्रांकावर नोटरी |

| | | |
|---|---|---|
| | | करून संमतीपत्र (**बंधपत्र नमुना क्र. ३ नुसार**)<br>**किंवा**<br>अर्जदाराने भाडे तत्वावर शेतजमीन घेतली असल्यास शेतजमीन मालकासोबत केलेल्या भाडेकराराची सत्यप्रत रु. १००/- च्या मुद्रांकावर नोटरी करून(बंधपत्र नमुना क्र. ४ नुसार)<br>9) स्वयंघोषणा **पत्र (बंधपत्र नमुना क्र. ५)**<br>10) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| ९ | ज्यांच्याकडे स्वत: च्या २० मेंढया व १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० मेंढ्यापेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या स्थलांतरीत स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थलांतरीत) | 1) जातीचा दाखला (**सक्षम प्राधिकाऱ्याचा**)<br>2) आधार कार्ड<br>3) रेशन कार्ड<br>4) बँक पासबुक<br>5) मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र (**बंधपत्र नमुना क्र. १ नुसार**)<br>6) अपत्य स्वयंघोषणा पत्र (**बंधपत्र नमुना क्र. २ नुसार**)<br>7) स्वयंघोषणा पत्र (**बंधपत्र नमुना क्र. ५ नुसार**)<br>8) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| १० | ज्यांच्याकडे स्वत: च्या ४० मेंढया व २ मेंढानर अशा एकूण ४२ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक अशा मेंढ्यांच्या एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थायी) | 1) जातीचा दाखला (**सक्षम प्राधिकाऱ्याचा**)<br>2) आधार कार्ड<br>3) रेशन कार्ड<br>4) बँक पासबुक<br>5) मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र (**बंधपत्र नमुना क्र. १ नुसार**)<br>6) अपत्य स्वयंघोषणा पत्र (**बंधपत्र नमुना क्र. २ नुसार**)<br>7) शेड बांधकामासाठी स्वत:ची किमान १ गुंठा जागा उपलब्ध असल्याबाबत ७/१२ उतारा किंवा मिळकत प्रमाणपत्र<br>8) वैरण उत्पादनाकरीता किमान १ एकर जागा उपलब्ध असल्याबाबतचा पुरावा खालील प्रमाणे,<br>स्वत:चे नावे जमीन असल्यास जमिनीचा ७/१२ उतारा<br>**किंवा**<br>अर्जदाराच्या नावे जमीन नसल्यास (कुटुंबीयांपैकी) संमतीपत्र देणाऱ्या व्यक्तीच्या नावाच्या शेतजमिनीचा ७/१२ उतारा व रु. १००/- रुपयाच्या मुद्रांकावर नोटरी करून संमतीपत्र (**बंधपत्र नमुना क्र. ३ नुसार**)<br>**किंवा**<br>अर्जदाराने भाडे तत्वावर शेतजमीन घेतली असल्यास शेतजमीन मालकासोबत केलेल्या भाडेकराराची सत्यप्रत रु. १००/- च्या मुद्रांकावर नोटरी करून(बंधपत्र नमुना क्र. ४ नुसार)<br>9) स्वयंघोषणा पत्र (बंधपत्र नमुना क्र. ५)<br>10) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) |

| | | |
|---|---|---|
| ११ | ज्यांच्याकडे स्वत: च्या ४० मेंढया व २ मेंढानर अशा एकूण ४२ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक अशा मेंढ्यांच्या स्थलांतरीत स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थलांतरीत) | 1) जातीचा दाखला **(सक्षम प्राधिकाऱ्याचा)**<br>2) आधार कार्ड<br>3) रेशन कार्ड<br>4) बँक पासबुक<br>5) मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र **(बंधपत्र नमुना क्र. १ नुसार)**<br>6) अपत्य स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. २ नुसार)**<br>7) स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. ५ नुसार)**<br>8) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| १२ | एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थायी) (१०० ग्रॅम प्रती दिन प्रती मेंढी याप्रमाणे माहे एप्रिल ते जुलै या ४ महिन्याच्या कालावधी करिता) | 1) जातीचा दाखला **(सक्षम प्राधिकाऱ्याचा)**<br>2) आधार कार्ड<br>3) रेशन कार्ड<br>4) बँक पासबुक<br>5) मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र **(बंधपत्र नमुना क्र. १ नुसार)**<br>6) अपत्य स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. २ नुसार)**<br>7) स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. ५ नुसार)**<br>8) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| १३ | भटकंती करणारे स्थलांतरीत स्वरूपाच्या मेंढी पालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थलांतरीत) (१०० ग्रॅम प्रती दिन प्रती मेंढी याप्रमाणे जून ते जुलै या २ महिन्याच्या कालावधी करिता) | 1) जातीचा दाखला **(सक्षम प्राधिकाऱ्याचा)**<br>2) आधार कार्ड<br>3) रेशन कार्ड<br>4) बँक पासबुक<br>5) मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र **(बंधपत्र नमुना क्र. १ नुसार)**<br>6) अपत्य स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. २ नुसार)**<br>7) स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. ५ नुसार)**<br>8) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| १४ | कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्याचा मुरघास करण्याकरिता गासड्या बांधण्याचे यंत्र (Mini Silage Baler Cum Wrapper) खरेदी करण्यासाठी ५०% अनुदान वाटप | 1) जातीचा दाखला **(सक्षम प्राधिकाऱ्याचा)**<br>2) आधार कार्ड<br>3) रेशन कार्ड<br>4) बँक पासबुक<br>5) अपत्य स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. २ नुसार)**<br>6) वैरण उत्पादनाकरीता किमान १ एकर जागा उपलब्ध असल्याबाबतचा पुरावा खालील प्रमाणे,<br>◆ स्वतःचे नावे जमीन असल्यास जमिनीचा ७/१२ उतारा<br>**किंवा**<br>◆ अर्जदाराच्या नावे जमीन नसल्यास (कुटुंबीयांपैकी) संमतीपत्र देणाऱ्या व्यक्तीच्या नावाच्या शेतजमिनीचा ७/१२ उतारा व रु. १००/- रुपयाच्या मुद्रांकावर नोटरी करून संमतीपत्र **(बंधपत्र नमुना क्र. ३ नुसार)** |

| | | |
|---|---|---|
| | | **किंवा**<br>◆ अर्जदाराने भाडे तत्वावर शेतजमीन घेतली असल्यास शेतजमीन मालकासोबत केलेल्या भाडेकराराची सत्यप्रत रु. १००/- च्या मुद्रांकावर नोटरी करून (**बंधपत्र नमुना क्र. ४ नुसार**)<br>7) स्वयंघोषणा पत्र (**बंधपत्र नमुना क्र. ५**)<br>8) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) |
| १५ | पशुखाद्य कारखाने उभारण्यासाठी ५०% अनुदान वाटप | 1) जातीचा दाखला (**सक्षम प्राधिकाऱ्याचा**)<br>2) आधार कार्ड<br>3) रेशन कार्ड<br>4) बँक पासबुक<br>5) अपत्य स्वयंघोषणा पत्र (**बंधपत्र नमुना क्र. २ नुसार**)<br>6) पशुखाद्य कारखाना उभारण्यासाठी स्वत:ची किमान १ गुंठा जागा उपलब्ध असल्याबाबत ७/१२ उतारा किंवा मिळकत प्रमाणपत्र<br>7) स्वयंघोषणा पत्र (**बंधपत्र नमुना क्र. ५**)<br>8) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास) |

५ **लाभार्थी निवड समिती**

मेंढीगट वाटप करणे, नरमेंढे वाटप करणे, पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देणे व संतुलित खाद्य उपलब्ध करून देणे (घटक क्रमांक १ ते १३) या योजनांचा लाभ घेण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी आणि लाभधारक निवड करण्याची प्रक्रिया खालील प्रमाणे गठित जिल्हास्तरीय समितीमार्फत पूर्ण करण्यात यावी.

**निवड समिती**

1) जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त : अध्यक्ष
2) जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद : सदस्य
3) संबंधीत तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) : सदस्य
4) सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय : सदस्य सचिव

लाभधारक निवड करतांना खालील बाबी विचारात घेऊन, त्याकरिता प्रत्येक घटकनिहाय स्वतंत्र लाभधारक निवडण्यात यावेत.

- अर्जदाराने वरील पहिल्या दोन घटकामधील कोणत्याही एका घटकाचा लाभ घेतल्यास त्यांना इतर घटकांचा लाभ घेता येणार नाही.
- अर्जदाराने ३ ते ७ या घटकांमधील कोणत्याही एका घटकाचा लाभ घेतल्यास त्यांना पहिले २ घटक वगळता उर्वरित घटकांमधील घटक क्रमांक ८ ते ११ मधील कोणत्याही एका घटकाचा लाभ घेता येईल, तसेच १२ व १३ मधील कोणत्याही एका घटकाचा लाभ घेता येईल.

कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्याचे मुरघास बनविण्याकरिता गासड्या बांधण्याचे यंत्र (Mini Silage Baler Cum Wrapper) खरेदी करण्यासाठी आणि पशुखाद्य कारखान्यासाठी अनुदान देणे, या घटकाचा अंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करण्याची आणि लाभधारकाची निवड करण्याची प्रक्रिया खालीलप्रमाणे गठित समितीमार्फत पूर्ण करण्यात येईल, लाभार्थी निवडीचे निकष शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

| | | |
|---|---|---|
| 1) | आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य | : अध्यक्ष |
| 2) | सह सचिव /उप सचिव (पशुसंवर्धन) | : सदस्य |
| 3) | व्यवस्थापकीय संचालक, पुअममेंवशेवि महामंडळ, पुणे | : सदस्य सचिव |

<u>योजनेचे सर्वसाधारण स्वरूप</u> :

1) या योजनेअंतर्गत कायमस्वरूपी एका ठिकाणी राहून मेंढी पालन करणारे (स्थायी) व स्थलांतर पद्धतीने मेंढीपालन करणारे (स्थलांतरित) असे दोन्ही प्रकारचे लाभार्थी योजनेचा लाभ घेऊ शकतील.
2) सदर योजनेअंतर्गत भटक्या जमाती (भज-क) प्रवर्गातील बचतगटांना / पशूपालक उत्पादक कंपन्यांना लाभार्थी म्हणून प्राधान्य देण्यात यावे.
3) कायमस्वरूपी एका ठिकाणी राहून मेंढी पालन करणाऱ्या लाभार्थ्यांना शेड बांधकाम, मोकळया जागेस कुंपण, खाद्याची व पिण्याच्या पाण्याची भांडी, फायबरची बादली आणि इतर साहित्य, जंतनाशके, किटकनाशक औषधे व खनिज विटा, पशुधनाचा विमा, चारा बियाणे ब बहुवार्षिक गवत प्रजातींचे ठोंबे/ बियाणे व प्रशिक्षण या बाबीसाठी अनुदान देण्यात यावे. यापैकी शेड बांधकाम, मोकळया जागेस कुंपण, खाद्याची व पिण्याच्या पाण्याची भांडी, फायबरची बादली आणि इतर साहित्य, जंतनाशके, किटकनाशक औषधे व खनिज विटा, पशुधनाचा विमा व प्रशिक्षण या बाबींकरिता थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने (DBT) द्यावयाचा आहे. त्यासाठी प्रथम लाभार्थीने या बाबी पूर्णता स्वखर्चाने खरेदी करावयाच्या/ उभारावयाच्या असून त्याची स्थानिक पशुधन विकास अधिकारी (विस्तार ) यांनी प्रत्यक्ष पडताळणी करून त्याचा फोटोसह अहवाल जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे मार्फत महामंडळास सादर केल्यानंतर लाभार्थीच्या अनुदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही महामंडळामार्फत करण्यात येईल. तसेच चारा बियाणे व बहुवार्षिक गवत प्रजातींचे ठोंबे/ बियाणे याबाबींचा पुरवठा महामंडळाच्या संबंधित प्रक्षेत्रामार्फत लाभार्थीस करणेत येईल व त्यासाठीच्या अनुदानाची रक्कम महामंडळाकडे जमा करणेत येईल.
4) स्थलांतर पद्धतीने मेंढीपालन करणाऱ्या लाभार्थ्यांना खाद्याची व पिण्याच्या पाण्याची भांडी, तंबू, सूती वाघुर, स्थलांतरणाच्या वेळी साहित्य वाहतूक करण्याकरिता खोगीर, फायबरची बादली आणि इतर साहित्य, जंतनाशके, कीटकनाशक औषधे व खनिज विटा, पशुधनाचा विमा आणि मेंढया चारण्यासाठी कुरण भाड्याने घेणे व प्रशिक्षण या बाबींसाठी अनूदान देण्यात यावे. या बाबींकरिता थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने (DBT) लाभ द्यावयाचा आहे. त्यासाठी प्रथम लाभार्थीने या बाबी पूर्णता स्वखर्चाने खरेदी करावयाच्या/ उभारावयाच्या असून त्याची स्थानिक पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांनी प्रत्यक्ष पडताळणी करून त्याचा फोटोसह अहवाल जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे मार्फत महामंडळास सादर केल्यानंतर लाभार्थीच्या अनुदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही महामंडळातर्फे करण्यात येईल.
5) शेड बांधण्याकरिता स्वत: ची जागा असणे आवश्यक आहे.

6) लाभधारकांनी शेड व मोकळ्या जागेस कुंपण बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पशुधन (मेंढ्या व नर) खरेदी करण्यात यावी.

7) सदर योजनेअंतर्गत लाभार्थींना वाटप करावयाच्या मेंढ्या व नर लाभार्थ्याने प्रथम स्वखर्चातून महामंडळाच्या प्रक्षेत्रावरून अथवा जनावरांच्या अधिकृत बाजारातून खालील समिती समक्ष खरेदी करण्यात यावे.

- जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त (संबंधित जिल्हा)
- पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती
- पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकीय दवाखाना
- विमा प्रतिनिधी
- लाभधारक

8) संबंधित जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी मेंढी गट खरेदी करण्यात आलेल्या पशुधन खरेदीच्या मूळ पावत्या तसेच खरेदी केलेले पशुधनासह खरेदी समितीचा एकत्रित फोटो व विमा पावतीसह खरेदी अहवाल महामंडळास सादर करण्यात यावा. जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे मार्फत सदर अहवाल महामंडळास सादर केल्यानंतर लाभार्थीच्या अनुदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही महामंडळामार्फत करण्यात यावी.

9) मेंढ्यांच्या वाहतुकीवर होणारा खर्च हा लाभधारकांनी स्वत: करावयाचा आहे.

10) या योजनेमध्ये कोणत्याही बाबीवरील होणारा अतिरिक्त खर्च हा लाभधारकांनी स्वत: करावयाचा असून, याकरिता कोणतेही शासनाचे अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

11) या योजनेमध्ये बांधावयाच्या शेडचा आराखडा महामंडळामार्फत तयार करण्यात यावा.

12) चारा बियाणे तसेच गवत प्रजातींचे ठोंबे/ बेणे इत्यादी महामंडळाच्या प्रक्षेत्रामार्फत लाभधारकांस पुरविण्यात यावे. लाभधारकांना स्वत: च्या जमिनीवर किंवा स्वत: ची जमीन नसल्यास भाडे तत्वावर जमीन उपलब्ध करून चाऱ्याची लागवड करणे आवश्यक राहील. याकरिता जमीन भाडे तत्वावर उपलब्ध केल्या बाबतचा करारनामा लाभधारकांनी सादर करणे आवश्यक राहील.

13) या योजने अंतर्गत पुरवठा करावयाचे चारा पिकांचे बियाणे तसेच ठोंबे/ बेने, अझोला कल्चर व मुरघास चा पुरवठा लाभार्थींच्या मागणीनुसार महामंडळाच्या प्रक्षेत्रावरून लाभधारकाने त्याचे हिस्याची २५% रक्कम रु. १२५०/- भरणा केल्या नंतर पुरवठा करण्यात यावा.

14) या योजनेमधील लाभधारकांना तीन दिवसाचे मेंढी पालन व्यवसायाचे प्रशिक्षण लाभधारकांना जवळ असलेल्या महामंडळाच्या प्रक्षेत्रामार्फत देण्यात यावे याकरिता लाभधारकांनी प्रथम स्वत: खर्च करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्यांना शासकीय अनुदान थेट DBT पद्धतीने त्यांचे बँक खाते मध्ये जमा करण्यात यावे.

15) या योजनेअंतर्गत पुरवठा करण्यात आलेल्या मेंढ्यांना आरोग्य सुविधा (लसीकरण, जंतनाशक औषध पाजणे इ.) नजिकच्या शासकीय / जिल्हा परिषदेच्या पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत पुरविण्यात यावे. मेंढयांमध्ये असणारी खनिजांची कमतरता भरून काढण्यासाठी खनिज मिश्रण/ मिनरल मिक्सचर ब्रिक्स पुरवठा करण्यात यावे.

16) या योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या मेंढ्यांना तीन वर्ष कालावधीकरिता विमा संरक्षण देणे बंधनकारक राहील. विमा पॉलीसी लाभधारक व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे संयुक्त नावे करणे आवश्यक राहील.

17) राज्यामध्ये मेंढीपालन व्यवसाय हा स्थलांतरण पद्धतीने केला जातो. स्थलांतरण काळामध्ये मेंढ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन, मेंढया आजारी पडण्याचे प्रमाण जास्त असेल. यावर मात कण्याकरिता ज्या गावामध्ये जास्त मेंढया आहेत किंवा ज्या मार्गावरून मेंढ्यांचे स्थलांतरण होते, हे ठिकाण किंवा गाव ज्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रामध्ये असेल त्या पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत अशा ठिकाणी दर आठवड्याला भेटी देऊन मेंढ्यांना आरोग्य सुविधा देण्याची व्यवस्था करण्यात यावी. परंतु, याकरिता सदर योजनेअंतर्गत कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

18) या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना महामंडळाच्या प्रक्षेत्रावरून देण्यात येणाऱ्या चारा बियाणे व बहुवार्षिक गवत प्रजातीचे ठोंबे / बियाणे या साठीचे अनुदान वगळता उर्वरित सर्व बाबींचे लाभ थेट लाभ हस्तांतरण प्रक्रियेच्या माध्यमातून (डीबीटी) लाभार्थ्यास देण्यात यावे.

19) **या योजनेअंतर्गत लाभार्थी निवडीमध्ये पुनरावृत्ती होणार नाही, याची दक्षता लाभार्थी निवड समितीने घ्यावी.**

20) या योजनेअंतर्गत सर्व लाभार्थींना आधार कार्ड सोबत संलग्न करण्यात यावे.

<u>प्रकल्प अंमलबजावणी अधिकारी</u>

व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ गोखलेनगर पुणे हे या योजनेची अंमलबजावणी करतील आणि विभागीय स्तरावर प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन व राज्य स्तरावर आयुक्त पशुसंवर्धन महाराष्ट्र राज्य यांचे या योजनेवर संनियंत्रण असेल.

(डॉ. शितलकुमार मुकणे)
**व्यवस्थापकीय संचालक**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र
मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे

प्रत,

१. मा. अपर मुख्य सचिव (पदु) महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. आयुक्त पशुसंवर्धन,महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ६७ यांना माहितीस्तव सविनय सादर

४ .प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व विभाग)

६. प्रक्षेत्र व्यवस्थापक (सर्व प्रक्षेत्रे), पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे

## परिशिष्ट- अ

### जिल्हा निहाय व घटक निहाय लाभधारक भौतिक उद्दिष्टे

| अक्र | जिल्ह्याचे नाव | घटक १ | घटक २ | घटक ३ | घटक ४ | घटक ५ | घटक ६ | घटक ७ | घटक ८ | घटक ९ | घटक १० | घटक ११ | घटक १२ | घटक १३ | घटक १४ | घटक १५ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | धुळे | 84 | 84 | 14 | 14 | 14 | 14 | 14 | 14 | 14 | 14 | 14 | 14 | 14 | 1 | 1 |
| 2 | पुणे | 73 | 73 | 12 | 12 | 12 | 12 | 12 | 12 | 12 | 12 | 12 | 12 | 12 | 1 | 1 |
| 3 | अहमदनगर | 58 | 58 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 10 | 1 | 1 |
| 4 | नाशिक | 55 | 55 | 9 | 9 | 9 | 9 | 9 | 9 | 9 | 9 | 9 | 9 | 9 | 1 | 1 |
| 5 | सातारा | 44 | 44 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 8 | 1 | 1 |
| 6 | सांगली | 38 | 38 | 7 | 7 | 7 | 7 | 7 | 7 | 7 | 7 | 7 | 7 | 7 | 1 | 1 |
| 7 | सोलापूर | 26 | 26 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 5 | 1 | 1 |
| 8 | कोल्हापूर | 23 | 23 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 1 | 1 |
| 9 | बुलढाणा | 21 | 21 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 4 | 1 | 1 |
| 10 | छ. संभाजीनगर | 17 | 17 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 1 | 1 |
| 11 | अमरावती | 14 | 14 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 3 | 1 | 1 |
| 12 | जळगाव | 14 | 14 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 1 | 1 |
| 13 | नांदेड | 13 | 13 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 1 | 1 |
| 14 | बीड | 13 | 13 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 1 | 1 |
| 15 | चंद्रपुर | 9 | 9 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 2 | 1 | 1 |
| 16 | लातूर | 7 | 7 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 17 | नंदुरबार | 6 | 6 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 18 | परभणी | 5 | 5 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 19 | जालना | 5 | 5 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 20 | धाराशिव | 5 | 5 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 |
| 21 | यवतमाळ | 4 | 4 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 |
| 22 | हिंगोली | 3 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 |
| 23 | गडचिरोली | 3 | 3 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 |
| 24 | नागपुर | 2 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 |
| 25 | अकोला | 2 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 |
| 26 | वाशिम | 2 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 |
| 27 | वर्धा | 2 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 |
| 28 | भंडारा | 2 | 2 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 1 | 0 | 0 |
| | एकूण | **550** | **550** | **100** | **100** | **100** | **100** | **100** | **100** | **100** | **100** | **100** | **100** | **100** | **20** | **20** |

*टीप- पालघर, रायगड, ठाणे , रत्नागिरी, सिंधुदुर्ग, गोंदिया या जिल्ह्यामध्ये २० व्या पशुगणनेनुसार मेंढ्यांची संख्या नगण्य असल्यामुळे शासन निर्णयामधील अट क्रमांक ८ (४) नुसार सदर जिल्ह्यामध्ये भौतिक उद्दिष्ट निश्चित होऊ शकले नाही.*

बंधपत्र नमूना क्रमांक – १

प्रमाणपत्र

(मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत)

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती. ---------------------------------------------------------- राहणार -------------------- तालुका ---------------- जिल्हा ------------------ यांचेकडे सध्या -------------- इतक्या मेंढ्या उपलब्ध असल्याचे आज दिनांक ---------------------- रोजी केलेल्या प्रत्यक्ष पडताळणी अंती आढळून आले आहे. तसेच त्यांच्याकडील मेंढ्यांचे संगोपन ----------------------- ( स्थलांतरित / स्थायी) पद्धतीने करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-

डॉ./ श्री.

सहा. आयुक्त पशुसंवर्धन, तालपसचिव --------------/

पविअ, पवैद श्रेणी – १ ------------------------------/-

सहा. पविअ/ प.प, पवैद श्रेणी – २ ----------------/-

बंधपत्र नमूना क्रमांक - २

## अपत्य स्वयंघोषणा पत्र

मी श्री/ श्रीमती (अर्जदाराचे नाव) ------------------------------------------------------------------------------------

श्री. ( वडिलाचे / पतीचे नाव)-----------------------------------------------------------------------------------------

यांचा मुलगा/मुलगी/पत्नी वय -------------- वर्ष------------------ रा.------------------------- ता.-----------------

जिल्हा ------------------------------ खालीलप्रमाणे सत्य प्रतिज्ञेवर सांगतो/सांगते की, आणि घोषित करतो/करते की,

1. मी राज्य शासनाच्या "राज्यातील भटक्या जमाती- क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीकरिता राबविण्यात येत असलेल्या योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज केला आहे.
2. माझ्या आज हयात असलेल्या अपत्यांची एकूण संख्या ---------------- इतकी आहे. त्यापैकी १ मे २००१ नंतर जन्मलेल्या अपत्यांची संख्या ------------------------- इतकी आहे.
3. दिनांक १ मे २००१ नंतर माझ्या एकूण हयात मुलांच्या संख्येत भर पडून ती दोन पेक्षा जास्त झाल्यास मी उपरोक्त योजनेतील लाभास अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

ठिकाण-----------------------
दिनांक-----------------------

अर्जदाराची सही/ अंगठा

बंधपत्र नमूना क्रमांक – ३

अर्जदाराच्या नावे जमीन नसल्यास (कुटुंबियांपैकी) संमतीपत्र देणाऱ्या व्यक्तीकडून करावयाच्या संमतीपत्राचा मसुदा

(रु. १००/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करून)

## "संमती पत्र"

मी खालील सही करणार श्री. / श्रीमती --------------------------------------------------------------------- रा. ------------------- तालुका------------------------- जिल्हा- -------------------------- येथील रहिवाशी असून, माझ्या नावे असलेली सर्वे नं. ----------- गट नं. ---------- मधील ----------- एकर एवढी शेतजमीन, माझे कुटुंबातील सदस्य श्री. श्रीमती ------------------------------------------------ (नातेसंबंध ---------------) यांना "राजे यशवंतराव होळकर महामेष योजने अंतर्गत" मेंढ्याकरिता वैरण उत्पादन करण्याकरिता वापरण्यास माझी पूर्ण संमती आहे, करिता लिहून देत आहे.

लिहून देणार (संमती देणारा)

स्वाक्षरी ---------------------------------

श्री / श्रीमती ---------------------------------

लिहून घेणार (अर्जदार)

स्वाक्षरी -----------------------------------

श्री / श्रीमती ---------------------------------

बंधपत्र नमूना क्रमांक – ४

भाडेतत्वावर शेतजमीन घेतली असल्यास शेतजमीन मालकासमवेत करावयाच्या भाडेकराराचा मसुदा

(रु.१००/- स्टॅम्प पेपर वर नोटरी करून)

## "भाडे करार"

मी खालील लिहून देणार श्री. / श्रीमती .------------------------------------------------------------------ रा. ------------------- तालुका------------------जिल्हा- ---------------- येथील रहिवाशी असून, माझ्या नावे असलेली सर्वे नं. गट नं. ---------- मधील ----------- एकर एवढी शेतजमीन, श्री. श्रीमती -------------------------- -------------------------- रा. --------------------- तालुका ---------------- जिल्हा- ----------------- यांना आज दिनांक ...............पासून पुढील ३ वर्षाकरिता भाडे तत्वावर "राजे यशवंतराव होळकर महामेष योजने अंतर्गत" मेंढ्याकरिता वैरण उत्पादन करण्याकरिता वापरण्यास देण्यात येत आहे. याकरिता वार्षिक रु.-----------/- इतके भाडे आकारणी करण्यात आलेले असून भाडे कराराची रक्कम मला आजरोजी प्राप्त झालेली आहे, करिता भाडेकरार करण्यात येत आहे.

लिहून देणार (शेतजमीन मालक)

स्वाक्षरी ----------------------------------
श्री / श्रीमती ----------------------------------

लिहून घेणार (अर्जदार)

स्वाक्षरी ----------------------------------
श्री / श्रीमती ---------------------------------

<u>बंधपत्र नमूना क्रमांक – ५</u>

# "स्वयंमघोषणा पत्र"

मी खालील सही करणार, श्री / श्रीमती (अर्जदाराचे नाव) ------------------------------------------------ श्री (वडिलाचे / पतीचे नाव) ------------------------------------------------ यांचा मुलगा / मुलगी / पत्नी वय ---- वर्ष, रा ---------------- ता --------------- जिल्हा ------------------, मी राज्य शासनाच्या "राज्यातील भटक्या जमाती- क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीकरिता राबविण्यात येत असलेल्या राज्य शासनाच्या योजनेचा" लाभ मिळण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज केलेला आहे. सदर अर्जामध्ये भरलेली माहिती तपासून ती खरी असल्याची खात्री केलेली आहे. तसेच मी अर्जासोबत जोडलेल्या रेशन कार्डनुसार माझे कुटुंबातील एकाच सदस्याने या योजनेअंतर्गत लाभासाठी अर्ज केला आहे. तसेच गेल्या तीन वर्षामध्ये पशुसंवर्धन विषयक कोणत्याही योजनेचा लाभ मी किंवा माझ्या कुटुंबातील व्यक्तींनी घेतलेला नाही, त्याचप्रमाणे मी स्व:ता किंवा माझ्या कुटुंबातील कोणताही सदस्य शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवा निवृत्ती वेतनधारक / शासकीय पदाचा लाभ घेणारा, तसेच राज्य, केंद्र शासन / स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य / पदाधिकारी / लोकप्रतींनिधी नाही. यामध्ये सादर केलेली माहिती खोटी आढळून आल्यास, मी उपरोक्त योजनेचा लाभ घेण्यास अपात्र ठरेन तसेच कायदेशीर कारवाईस पात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची सही/ अंगठा

ठिकाण-----------------------
दिनांक----------------------

## विवरणपत्र क्रमांक – अ

घटक क्रमांक- १ कायमस्वरूपी एका ठिकाणी राहून मेंढीपालन करण्याकरिता पायाभूत सोई - सुविधेसह २० मेंढया + १ मेंढानर असा मेंढीगट ७५% अनुदानावर वाटप करणे **(स्थायी)** या घटकामध्ये समाविष्ट बाबी.

| अ क्रं | बाब | संख्या | दर (रू.) | गटाची एकूण किंमत (रु) | शासनाचे अनुदान (रु) ७५% | लाभधारक हिस्सा (रु) २५% |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पशुधन खरेदी | २० मेंढया | ८०००/- | १६००००/- | १२००००/- | ४००००/- |
| | | १ मेंढानर | १००००/- | १००००/- | ७५००/- | २५००/- |
| २ | शेड बांधकाम | २१ प्रौढ मेंढ्यासाठी प्रत्येकी १० चौ. फुट प्रमाणे २१० चौ. फू. आणि २० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फू प्रमाणे १०० चौ. फुट असे एकूण ३१० चौ. फुट बांधकाम | रु. २५०/- प्रती चौ. फुट | ७७५००/- | ५८१२५/- | १९३७५/- |
| ३ | मोकळ्या जागेस कुंपण | २१ प्रौढ मेंढ्यासाठी प्रत्येकी २० चौ. फुट प्रमाणे ४२० चौ. फू. आणि २० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फू प्रमाणे १०० चौ. फुट असे एकूण ५२० चौ. फुट बांधकाम | रु. १००/- प्रती चौ. फुट | ५२०००/- | ३९०००/- | १३०००/- |
| ४ | खाद्याची व पिण्याच्या पाण्याची भांडी | २० मेंढया व १ मेंढानर गटाकरिता | - | १००००/- | ७५००/- | २५००/- |
| ५ | जंतनाशक, कीटकनाशक औषधे व खनिज विटा | २० + १ गटाकरिता | - | २०००/- | १५००/- | ५००/- |
| ६ | पशुधनाचा विमा सेवाशुल्कासह | २० + १ गटाकरिता | पशुधनाच्या किंमतीवर ४ % + सर्व्हिस टॅक्स | ८५००/- | ६३७५/- | २१२५/- |
| ७ | चारा बियाणे व बहुवार्षिक प्रजातीचे ठोंबे/ बेने खरेदी तसेच अझोला व मुरघास तयार करणे | २० मेंढया व १ मेंढानर गटाकरिता | - | ११०००/- | ८२५०/- | २७५०/- |
| ८ | प्रशिक्षण | - | २०००/- | २०००/- | १५००/- | ५००/- |
| | **एकूण किंमत २०+ १ गटाकरिता** | - | - | ३,३३,०००/- | २,४९,७५०/- | ८३,२५०/- |

## विवरणपत्र क्रमांक – ब

घटक क्रमांक- २ स्थलांतर पद्धतीने मेंढीपालन करण्याकरिता पायाभूत सोई – सुविधेसह २० मेंढया + १ मेंढानर असा मेंढीगट ७५% अनुदानावर वाटप करणे **(स्थलांतरीत)** या घटकामध्ये समाविष्ट बाबी,

| अ क्रं | बाब | संख्या | दर (रू.) | गटाची एकूण किंमत (रु) | शासनाचे अनुदान (रु) ७५% | लाभधारक हिस्सा (रु) २५% |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पशुधन खरेदी | २० मेंढया | ८०००/- | १६०००० | १२०००० | ४०००० |
| | | १ मेंढानर | १००००/- | १०००० | ७५०० | २५०० |
| २ | तंबू, सूती वाघर, स्थलांतरणाच्या वेळी साहित्य वाहतूक करण्याकरिता वाहतूक पिशव्या, फायबर ची बादली, खाद्याचे व पिण्याच्या पाण्याची भांडी आणि इतर साहित्य | २०+ १ गटाकरिता | - | १५००० | ११२५० | ३७५० |
| ३ | जंतनाशक, कीटकनाशक औषधे व खनिज विटा | २०+ १ गटाकरिता | - | २००० | १५०० | ५०० |
| ४ | पशुधनाचा विमा सेवाशुल्कासह | २०+ १ गटाकरिता | पशुधनाच्या किंमतीवर ४% + सर्व्हिस टॅक्स | ८५०० | ६३७५ | २१२५ |
| ५ | मेंढ्या चारण्यासाठी कुरण भाड्याने घेणे किंवा चारा विकत घेणे | २०+ १ गटाकरिता | - | ५००० | ३७५० | १२५० |
| ६ | प्रशिक्षण | - | २,०००/- | २००० | १५०० | ५०० |
| | एकूण किंमत २०+ १ गटाकरिता | - | - | २,०२,५०० | १,५१,८७५ | ५०,६२५ |

<u>विवरणपत्र क्रमांक – क</u>

<u>घटक क्रमांक- ३ ते ७, सुधारित प्रजातीचे नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे</u>

| घटक क्रमांक | | प्रती मेंढानर किंमत | मेंढानराची एकूण किंमत (रु.) | लाभधारक हिस्सा २५% (रु.) | शासन अनुदान ७५% (रु) |
|---|---|---|---|---|---|
| 3 | ज्यांच्याकडे स्वत:चे २० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० पेक्षा कमी मेंढया आहेत अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा १ नरमेंढा ७५% अनुदानावर वाटप करणे. | रु. १०,०००/- प्रती मेंढानर | १०,०००/- | २,५००/- | ७,५००/- |
| 4 | ज्यांच्याकडे स्वत:चे ४० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ६० पेक्षा कमी मेंढया आहेत अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा २ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. | रु. १०,०००/- प्रती मेंढानर | २०,०००/- | ५,०००/- | १५,०००/- |
| 5 | ज्यांच्याकडे स्वत:चे ६० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ८० पेक्षा कमी मेंढया आहेत अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा ३ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. | रु. १०,०००/- प्रती मेंढानर | ३०,०००/- | ७,५००/- | २२,५००/- |
| 6 | ज्यांच्याकडे स्वत:चे ८० किंवा त्यापेक्षा अधिक परंतु १०० पेक्षा कमी मेंढया आहेत अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा ४ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. | रु. १०,०००/- प्रती मेंढानर | ४०,०००/- | १०,०००/- | ३०,०००/- |
| 7 | ज्यांच्याकडे स्वत:चे १०० किंवा त्यापेक्षा अधिक मेंढया आहेत अशा लाभार्थ्यांना सुधारित प्रजातीचा ५ नरमेंढे ७५% अनुदानावर वाटप करणे. | रु. १०,०००/- प्रती मेंढानर | ५०,०००/- | १२,५००/- | ३७,५००/- |

## विवरणपत्र क्रमांक - ड

घटक क्रमांक- ८ , ज्यांच्याकडे स्वत: च्या २० मेंढया व १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० मेंढ्यापेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप **(स्थायी)** या घटकामध्ये समाविष्ट बाबी,

| अ क्रं | बाब | संख्या | दर (रू.) | एकूण किंमत प्रती लाभधारक (रु) | शासनाचे अनुदान (रु) ७५% | लाभधारक हिस्सा (रु) २५% |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शेड बांधकाम | २१ प्रौढ मेंढ्यासाठी प्रत्येकी १० चौ. फुट प्रमाणे २१० चौ. फू. आणि २० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फू प्रमाणे १०० चौ. फुट असे एकूण ३१० चौ. फुट बांधकाम | रु. २५०/- प्रती चौ. फुट | ७७,५००/- | ५८,१२५/- | १९,३७५/- |
| २ | मोकळ्या जागेस कुंपण | २१ प्रौढ मेंढ्यासाठी प्रत्येकी २० चौ. फुट प्रमाणे ४२० चौ. फू. आणि २० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फू प्रमाणे १०० चौ. फुट असे एकूण ५२० चौ. फुट बांधकाम | रु. १००/- प्रती चौ. फुट | ५२,०००/- | ३९,०००/- | १३,०००/- |
| ३ | खाद्याची व पिण्याच्या पाण्याची भांडी | २० मेंढया व १ मेंढानर | - | १०,०००/- | ७,५००/- | २,५००/- |
| ४ | जंतनाशक, कीटकनाशक औषधे व खनिज विटा | २० मेंढया व १ मेंढानर | - | २,०००/- | १,५००/- | ५००/- |
| ५ | पशुधनाचा विमा सेवाशुल्कासह | २० मेंढया व १ मेंढानर | पशुधनाच्या किंमतीवर ४ % + सर्व्हिस टॅक्स | ८,५००/- | ६,३७५/- | २,१२५/- |
| ६ | चारा बियाणे व बहुवार्षिक प्रजातीचे ठोंबे/ बेने खरेदी तसेच अझोला व मुरघास तयार करणे | २० मेंढया व १ मेंढानर | - | ११,०००/- | ८,२५०/- | २,७५०/- |
| ७ | प्रशिक्षण | - | २०००/- | २,०००/- | १,५००/- | ५००/- |
| | **एकूण किंमत** | - | - | १,६३,०००/- | १,२२,२५०/- | ४०,७५०/- |

## विवरणपत्र क्रमांक – ई

घटक क्रमांक- ९, ज्यांच्याकडे स्वत: च्या २० मेंढया व १ मेंढानर अशा एकूण २१ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक परंतु ४० मेंढ्यापेक्षा कमी अशा मेंढ्यांच्या स्थलांतरीत स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थलांतरीत) या घटकामध्ये समाविष्ट बाबी,

| अ क्रं | बाब | संख्या | दर (रू.) | एकूण किंमत प्रती लाभधारक (रु) | शासनाचे अनुदान (रु) ७५% | लाभधारक हिस्सा (रु) २५% |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तंबू, सूती वाघर, स्थलांतरणाच्या वेळी साहित्य वाहतूक करण्याकरिता वाहतूक पिशव्या, फायबर ची बादली, खाद्याचे व पिण्याच्या पाण्याची भांडी आणि इतर साहित्य | २० मेंढया + १ मेंढानर | - | १५,०००/- | ११,२५०/- | ३,७५०/- |
| २ | जंतनाशक, कीटकनाशक औषधे व खनिज विटा | २० मेंढया + १ मेंढानर | - | २,०००/- | १,५००/- | ५००/- |
| ३ | पशुधनाचा विमा सेवाशुल्कासह | २० मेंढया + १ मेंढानर | पशुधनाच्या किंमतीवर ४ % + सर्व्हिस टॅक्स | ८,५००/- | ६,३७५/- | २,१२५/- |
| ४ | मेंढ्या चारण्यासाठी कुरण भाड्याने घेणे किंवा चारा विकत घेणे | २० मेंढया + १ मेंढानर | - | ५,००० | ३,७५०/- | १,२५०/- |
| ५ | प्रशिक्षण | - | २,०००/- | २,००० | १,५००/- | ५००/- |
|  | एकूण किंमत | - | - | ३२,५००/- | २४,३७५/- | ८,१२५/- |

## विवरणपत्र क्रमांक – फ

घटक क्रमांक- १०, ज्यांच्याकडे स्वत: च्या ४० मेंढया व २ मेंढानर अशा एकूण ४२ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक अशा मेंढ्यांच्या एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थायी) या घटकामध्ये समाविष्ट बाबी,

| अ क्रं | बाब | संख्या | दर (रू.) | एकूण किंमत प्रती लाभधारक (रु) | शासनाचे अनुदान (रु) ७५% | लाभधारक हिस्सा (रु) २५% |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शेड बांधकाम | ४२ प्रौढ मेंढ्यासाठी प्रत्येकी १० चौ. फुट प्रमाणे ४२० चौ. फू. आणि ४० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फू प्रमाणे २०० चौ. फुट असे एकूण ६२० चौ. फुट बांधकाम | रु. २५०/- प्रती चौ. फुट | १,५५,०००/- | १,१६,२५०/- | ३८,७५०/- |
| २ | मोकळ्या जागेस कुंपण | ४२ प्रौढ मेंढ्यासाठी प्रत्येकी २० चौ. फुट प्रमाणे ८४० चौ. फू. आणि ४० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फू प्रमाणे २०० चौ. फुट असे एकूण १०४० चौ. फुट बांधकाम | रु. १००/- प्रती चौ. फुट | १,०४,०००/- | ७८,०००/- | २६,०००/- |
| ३ | खाद्याची व पिण्याच्या पाण्याची भांडी | ४० मेंढया व २ मेंढेनर | - | २०,०००/- | १५,०००/- | ५०००/- |
| ४ | जंतनाशक, कीटकनाशक औषधे व खनिज विटा | ४० मेंढया व २ मेंढेनर | - | ४,०००/- | ३,०००/- | १०००/- |
| ५ | पशुधनाचा विमा सेवाशुल्कासह | ४० मेंढया व २ मेंढेनर | पशुधनाच्या किंमतीवर ४ % + सर्व्हिस टॅक्स | १७,०००/- | १२,७५०/- | ४२५०/- |
| ६ | चारा बियाणे व बहुवार्षिक प्रजातीचे ठोंबे/ बेने खरेदी तसेच अझोला व मुरघास तयार करणे | ४० मेंढया व २ मेंढेनर | - | १५,०००/- | ११,२५०/- | ३७५०/- |
| ७ | प्रशिक्षण | - | २०००/- | २,०००/- | १,५००/- | ५००/- |
|  | एकूण किंमत | - | - | ३,१७,०००/- | २,३७,७५०/- | ७९,२५०/- |

## विवरणपत्र क्रमांक – ग

घटक क्रमांक- ११ , ज्यांच्याकडे स्वत: च्या ४० मेंढया व २ मेंढानर अशा एकूण ४२ मेंढया किंवा त्यापेक्षा अधिक अशा मेंढ्यांच्या स्थलांतरीत स्वरूपाचे मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थलांतरीत) या घटकामध्ये समाविष्ट बाबी,

| अ क्रं | बाब | संख्या | दर (रू.) | एकूण किंमत प्रती लाभधारक (रु) | शासनाचे अनुदान (रु) ७५% | लाभधारक हिस्सा (रु) २५% |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | तंबू, सूती वाघर, स्थलांतरणाच्या वेळी साहित्य वाहतूक करण्याकरिता वाहतूक पिशव्या, फायबर ची बादली, खाद्याचे व पिण्याच्या पाण्याची भांडी आणि इतर साहित्य | ४० मेंढया व २ मेंढेनर | - | २०,०००/- | १५,०००/- | ५,०००/- |
| २ | जंतनाशक, कीटकनाशक औषधे व खनिज विटा | ४० मेंढया व २ मेंढेनर | - | ४,०००/- | ३,०००/- | १,०००/- |
| ३ | पशुधनाचा विमा सेवाशुल्कासह | ४० मेंढया व २ मेंढेनर | पशुधनाच्या किंमतीवर ४ % + सर्व्हिस टॅक्स | १७,०००/- | १२,७५०/- | ४,२५०/- |
| ४ | मेंढ्या चारण्यासाठी कुरण भाड्याने घेणे किंवा चारा विकत घेणे | ४० मेंढया व २ मेंढेनर | - | ५,००० | ३,७५०/- | १,२५०/- |
| ५ | प्रशिक्षण | - | २,०००/- | २,००० | १,५००/- | ५००/- |
| | एकूण किंमत | - | - | ४८,०००/- | ३६,०००/- | १२,०००/- |

## विवरणपत्र क्रमांक - ह

घटक क्रमांक - १२ , एका ठिकाणी राहून स्थायी स्वरूपाचे मेंढी पालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थायी)

| बाब | प्रती किलो किंमत | लाभधारक हिस्सा रक्कम प्रती किलो खाद्य (रु.) | शासन अनुदान ७५% प्रती किलो खाद्य (रु) |
|---|---|---|---|
| स्थायी पद्धतीने मेंढीपालन<br>(१०० ग्रॅम प्रती दिन प्रती मेंढी याप्रमाणे माहे एप्रिल ते जुलै या ४ महिन्याच्या म्हणजेच १२० दिवसाच्या कालावधी करिता)<br>१२ किलो प्रती मेंढी | रु. 25/- प्रती किलो | रु. 6.25/- प्रती किलो | रु. 18.75 प्रती किलो |

## विवरणपत्र क्रमांक – इ

घटक क्रमांक – १३, भटकंती करणारे स्थलांतरीत स्वरूपाच्या मेंढी पालनासाठी संतुलित खाद्य उपलब्ध करून देण्यासाठी ७५% अनुदान वाटप (स्थलांतरीत)

| बाब | प्रती किलो किंमत | लाभधारक हिस्सा रक्कम प्रती किलो खाद्य (रु.) | शासन अनुदान ७५% प्रती किलो खाद्य (रु) |
|---|---|---|---|
| स्थलांतरीत पद्धतीने मेंढीपालन<br>(१०० ग्रॅम प्रती दिन प्रती मेंढी याप्रमाणे माहे जून ते जुलै या २ महिन्याच्या म्हणजेच ६० दिवसाच्या कालावधी करिता)<br>६ किलो प्रती मेंढी | रु. 25/- प्रती किलो | रु. 6.25/- प्रती किलो | रु. 18.75 प्रती किलो |

## विवरणपत्र क्रमांक – ज

घटक क्रमांक – १४, कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्या चा मुरघास करण्याकरिता गासड्या बांधण्याचे यंत्र (Mini Silage Baler Cum Wrapper) खरेदी करण्यासाठी अनुदान वाटप

| बाब | किंमत | लाभधारक हिस्सा रक्कम (रु.) | शासन अनुदान ५० % प्रती किलो खाद्य (रु) | एकूण उधीष्ट |
|---|---|---|---|---|
| कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्या चा मुरघास करण्याकरिता गासड्या बांधण्याचे यंत्र (Mini Silage Baler Cum Wrapper) खरेदी करण्यासाठी अनुदान वाटप | रु. ८.००लक्ष | रु. ४.०० लक्ष | रु. ४.००लक्ष (५० % अनुदान) | २० यंत्र |

## विवरणपत्र क्रमांक – क

घटक क्रमांक - १५
पशुखाद्य कारखाने उभारण्यासाठी अनुदान वाटप

| बाब | किंमत | लाभधारक हिस्सा रक्कम (रु.) | शासन अनुदान ५० % प्रती किलो खाद्य (रु) | एकूण उधीष्ट |
|---|---|---|---|---|
| पशुखाद्य कारखाने उभारण्यासाठी अनुदान वाटप | रु. १०.०० लक्ष | रु. ५.०० लक्ष | रु. ५.०० लक्ष (५०% अनुदान) | २० लाभधारक |

राज्यातील भटक्या जमाती- क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीमधील मेंढपाळ कुटुंबांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्यासाठी **चराई अनुदान देणे** या योजनेच्या

## मार्गदर्शक सूचना

प्रती,

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त (सर्व जिल्हे)
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व जिल्हे)

**विषय-** राज्यातील भटक्या जमाती- क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीमधील मेंढपाळ कुटुंबांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्यासाठी चराई अनुदान देणे या योजनेच्या अंमलबजावणी बाबतच्या मार्गदर्शक सूचना

**संदर्भ** - १. शासन निर्णय क्रमांक - पविआ-१०१९/ प्र. क्र. २१६/ पदुम-३ दिनांक- २०/०९/२०१९
२. सन २०२३ च्या हिवाळी अधिवेशनामधील पूरक मागणीनुसार प्राप्त तरतूद
३. शासन निर्णय क्रमांक - पविआ-२०२३/ प्र. क्र. ५५५/ पदुम-३ दिनांक १४/०३/२०२४

**जावक क्रमांक** - पुअममेवशेविमपु/तांत्रिक/चराईअनुदान/ मार्गदर्शक सूचना/१००० /२०२४, दिनांक०६/०९ /२०२४

राज्यातील भटक्या जमाती - क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील ज्या मेंढपाळ कुटुंबाकडे किमान २० मेंढया व १ मेंढानर एवढे पशुधन असणाऱ्या कुटुंबांना माहे **जून ते सप्टेंबर** या चार महिन्याच्या कालावधीसाठी प्रतिमाह रु. ६,०००/- असे एकूण २४,०००/- चराई अनुदान वाटप करणे करिता शासन निर्णय क्रमांक पविआ-१०१९/प्र.क्र.२१६/ पदुम-३ दिनांक- २०/०९/२०१९ अन्वये **"राज्यातील भटक्या जमाती-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीमधील मेंढपाळ कुटुंबांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्यासाठी चराई अनुदान देणे"** ही योजना राज्यस्तरीय योजनेंतर्गत राबविणेस शासनाची मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच संदर्भीय शासन निर्णय क्रमांक-पविआ-२०२३/ प्र. क्र. ५५५/ पदुम-३ दिनांक- १४/०३/२०२४ अन्वये निवड समितीमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या मूळ शासन निर्णयानुसार राज्यातील जिल्हानिहाय मेंढपाळ कुटुंबांची संख्या विचारात घेऊन मुंबई व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता उर्वरित ३४ जिल्ह्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यात कमाल २००० लाभार्थीना चराई अनुदान वाटप करण्याचे नमूद आहे. यास अनुसरून तसेच *Livestock Population (2012), Govt. of India, Volume II, Chapter 22, Page No. 399, Table No. 27* नुसार राज्यातील जिल्हा निहाय मेंढपाळ कुटुंबांची संख्या विचारात घेऊन सदर योजनेमध्ये ३६६१२ लाभधारकाकरीता रु. ८७.८६ कोटी निधी प्रस्तावित आहे. यापैकी सन २०२३-२४ मध्ये रु. ५.०० कोटी निधी प्राप्त झालेला असून, सन २०२४-२५ या चालू आर्थिक वर्षामध्ये रु. ३.३३ कोटी निधीची तरतूद अर्थसंकल्पित आहे. असे एकुण रु. ८.३३ कोटी निधी मधून राज्यातील ३४ जिल्ह्यामधील ३४७० लाभधारकांची निवड करून त्यांना चराई अनुदान द्यावयाचे आहे. सदर योजना अंमलबजावणी बाबतच्या सुधारित मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे. शासनाने सदर योजनेसंदर्भात वरील संदर्भीय शासन निर्णयामध्ये नमूद केलेले आर्थिक निकष, सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना, अटी व शर्ती नुसार योजना राबविण्यात यावी.

**योजनेचा उद्देश :-**

१. राज्यातील मेंढपाळ कुटुंबांना पावसाळ्यात चराई करिता जून ते सप्टेंबर या ४ महिन्याच्या कालावधीमध्ये चराई अनुदान देऊन या व्यवसायास चालना देणे.

२. राज्यातील मेंढ्यांच्या संख्येमध्ये सातत्याने होत असलेली घट थांबविणे किंबहुना त्यामध्ये वाढ करून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

३. राज्यातील मेंढीपालन व्यवसायास चालना देऊन ग्रामीण रोजगार निर्मिती करणे.

**योजनेची वैशिष्टे :-**

मेंढी पालन व्यवसाय हा पुर्णपणे स्थलांतरित पध्दतीने केला जातो. मेंढपाळ त्यांच्या मेंढ्याकरिता चारा व पाण्याच्या शोधात साधारणपणे माहे ऑक्टोबर पासून भटकंती करीत असतात. भटकंती काळात मेंढपाळ त्यांच्या मेंढ्याकरिता चारा व पिण्याचे पाण्याच्या शोधात **सतत स्थलांतरण करत** असतात. पावसाळी हंगामामध्ये मुळस्थानी **मेंढपाळ** परत आल्यानंतर त्या **भागामध्ये** पाऊस फार अत्यल्प **होत असल्यामुळे** चारा उपलब्ध होत नाही.

जुन ते ऑक्टोबर या काळात मेंढपाळ नजीकच्या स्थानिक ठिकाणी, नदी किनारी, शेतकऱ्यांच्या बांधावर तसेच नजीकच्या वन क्षेत्रावर त्यांच्या मेंढ्यांची चराई करीत असतात. हल्लीच्या काळामध्ये शेतकरी शेतामध्ये तणनाशक तसेच कीटकनाशक औषधांचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे. तसेच राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगीकरण सुरू असल्यामुळे बऱ्याच रसायन कंपण्यामधील कचरा पाणी नदी-नाल्यामध्ये सोडण्यात येते. त्यामुळे भटकंती काळात मेंढ्यांचा संपर्क या विषारी **रसायनांसी** आल्यामुळे विषबाधा होण्याचे प्रकार नेहमी घडत असतात. यामुळे मेंढपाळांना मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागते. दिवसेंदिवस ही समस्या वाढत असल्यामुळे या कालावधी मध्ये त्यांच्या मेंढ्यांना चारा उपलब्ध करणेकरिता मोठ्या अडचणीचा सामना करावा लागतो. त्यामुळे चराई करिता शासनाकडून अर्थ सहाय्य उपलब्ध झाल्यास त्यांना अडचणीचा सामना करावा लागणार नाही.

**योजना राबविण्याचे कार्यक्षेत्र** :- सदर योजना मुंबई व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरित ३४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात यावी.

**लाभार्थी निवडीचे भौतिक उद्धिष्ट :-**

सदर योजनेच्या मूळ शासन निर्णयानुसार राज्यातील जिल्हानिहाय मेंढपाळ कुटुंबांची संख्या विचारात घेऊन मुंबई व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता उर्वरित ३४ जिल्ह्यामध्ये प्रत्येक जिल्ह्यात कमाल २००० लाभार्थींना चराई अनुदान वाटप करण्याचे नमूद आहे. यास अनुसरून तसेच ***Livestock Population (2012), Govt. of India, Volume II, Chapter 22, Page No. 399, Table No. 27*** नुसार राज्यातील जिल्हा निहाय मेंढपाळ कुटुंबांची संख्या विचारात घेऊन सदर योजनेमध्ये ३६६१२ लाभधारकाकरीता रु. ८७.८६ कोटी निधी प्रस्तावित आहे.

यापैकी सन २०२३-२४ मध्ये रु. ५.०० कोटी निधी प्राप्त झालेला असून, सन २०२४-२५ या चालू आर्थिक वर्षामध्ये रु. ३.३३ कोटी निधीची तरतूद अर्थसंकल्पित आहे. असे एकूण रु. ८.३३ कोटी निधी मधून राज्यातील ३४ जिल्ह्यामधील ३४७० लाभधारकांची निवड करून त्यांना चराई अनुदान द्यावयाचे आहे. त्यानुसार जिल्हानिहाय लाभधारक निवडीचे उद्धिष्ट पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | राज्यातील मेंढपाळ कुटुंबांची संख्या | योजनेचे एकूण भौतिक उद्दिष्ट | सन २०२४-२५ करिता मंजूर रु. ८.३३ कोटी मधील भौतिक उद्दिष्टे (लाभधारकांची संख्या) |
|---|---|---|---|---|
| 1 | अहमदनगर | 9121 | 2000 | 189 |
| 2 | अकोला | 267 | 267 | 25 |
| 3 | अमरावती | 819 | 819 | 77 |
| 4 | औरंगाबाद | 3395 | 2000 | 189 |
| 5 | भंडारा | 115 | 115 | 10 |
| 6 | बीड | 2712 | 2000 | 189 |
| 7 | बुलढाणा | 2206 | 2000 | 189 |
| 8 | चंद्रपूर | 1077 | 1077 | 102 |
| 9 | धुळे | 5549 | 2000 | 189 |
| 10 | गडचिरोली | 389 | 389 | 36 |
| 11 | गोंदीया | 450 | 450 | 42 |
| 12 | हिंगोली | 216 | 216 | 20 |
| 13 | जळगाव | 2038 | 2000 | 190 |
| 14 | जालना | 1314 | 1314 | 124 |
| 15 | कोल्हापूर | 3952 | 2000 | 190 |
| 16 | लातुर | 1027 | 1027 | 97 |
| 17 | नागपूर | 437 | 437 | 41 |
| 18 | नांदेड | 1159 | 1159 | 110 |
| 19 | नंदुरबार | 407 | 407 | 38 |
| 20 | नाशिक | 17970 | 2000 | 190 |
| 21 | उस्मानाबाद | 2053 | 2000 | 190 |
| 22 | परभणी | 1025 | 1025 | 97 |
| 23 | पुणे | 13674 | 2000 | 190 |
| 24 | रायगड | 82 | 82 | 7 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 25 | रत्नागिरी | 15 | 25 | 5 |
| 26 | सांगली | 7787 | 2000 | 190 |
| 27 | सातारा | 10702 | 2000 | 190 |
| 28 | सिंधुदुर्ग | 2 | 2 | 4 |
| 29 | सोलापूर | 6588 | 2000 | 190 |
| 30 | ठाणे | 236 | 236 | 22 |
| 31 | पालघर | 236 | 236 | 22 |
| 32 | वर्धा | 132 | 132 | 12 |
| 33 | वाशिम | 126 | 126 | 12 |
| 34 | यवतमाळ | 1071 | 1071 | 102 |
| | एकुण | **98349** | **36612** | **3470** |

लाभार्थी निवडीचे निकष : -

१. सदर योजनेचा लाभ राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचित केलेल्या केवळ भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजामधील ज्या मेंढपाळ कुटुंबाकडे किमान २० मेंढया व १ मेंढानर असलेल्या मेंढपाळ कुटुंबातील एका व्यक्तीस लाभ घेता येईल.

२. लाभधारकाचे वय १८ वर्षापेक्षा कमी नसावे व ६० वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. लाभधारकांची निवड करताना, महिलांकरिता ३०% व दिव्यांगाकरिता ३% आरक्षण देण्यात यावे.

४. लाभार्थ्यास आधार कार्ड सोबत संलग्न करण्यात यावे.

५. अर्जदार किंवा अर्जदाराच्या कुटुंबातील सदस्य शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवा निवृत्ती वेतनधारक / शासकीय पदाचा लाभ घेणारा, तसेच राज्य, केंद्र शासन / स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य / पदाधिकारी/ लोकप्रतींनिधी नसावा.

लाभधारक निवडीची कार्यपद्धती :-

१ पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत सदर योजनेस राज्यस्तरीय वृत्तपत्रातून व्यापक प्रसिद्धी देऊन ऑनलाईन अर्ज मागविण्यात येतील

२ सदर योजनेअंतर्गत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविणे, लाभधारक निवड समितीमार्फत अर्जाची छाननी व निवड करणे या करिता महामंडळामार्फत Web / Android Application उपलब्ध करून देण्यात येईल

३ लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली असून, सदर समिती लाभार्थ्यांची निवड करून यादी जाहीर करेल

- जिल्हाधिकारी - अध्यक्ष
- जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद) - सदस्य
- सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग - सदस्य
- जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त - सदस्य सचिव

४ ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेल्या अर्जाची जिल्हास्तरीय निवड समिती मार्फत प्रथम प्राथमिक लाभधारक निवड (Randomization) करण्यात यावी.

५ प्राथमिक निवड (Randomization) झालेल्या लाभधारकांकडून ऑनलाईन पद्धतीने कागदपत्रे अपलोड करून घ्यावी.

६ प्राथमिक निवड झालेल्या लाभधारकांकडून ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेल्या कागदपत्रांची तपासणी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय स्तरावर करण्यात येईल.

७ जिल्हा निवड समितीमार्फत लाभार्थ्यांची निवड यादी एकास दहा (1 + 10 Waiting) या प्रमाणे अंतिम करून त्यास स्थानिक प्रसिद्धी द्यावी.

८ लाभार्थी निवड समितीमार्फत पात्र अर्जामधून पुढील प्रतीक्षा यादी तयार करून सदरची लाभार्थी यादी पुढील पाच वर्ष ग्राह्य धरण्यात येईल. तसेच शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीस आधीन राहून त्यानुसार दरवर्षी अर्ज मागवून प्रतीक्षा यादी तयार करण्यात येईल.

९ जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त हे त्यांच्या अधिनस्त जिल्ह्यात निवड झालेल्या लाभार्थांची यादी व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे यांना त्यांच्या शिफारशीसह सादर करतील.

१० निवड झालेल्या पात्र लाभार्थ्यांना महामंडळामार्फत चराई अनुदानाची रक्कम थेट हस्तांतरण पद्धतीने (डीबीटी) लाभधारकांच्या बँक खातेवर जमा करण्यात येतील.

११ एखाद्या तालुक्यात लाभार्थींची संख्या किमान लाभार्थी संख्येपेक्षा कमी आढळून आल्यास जिल्हास्तरीय गठीत समितीच्या मान्यतेने उर्वरित लक्षांक इतर तालुक्याकडे वर्ग करता येऊ शकेल.

**प्राथमिक निवड झाल्यानंतर सादर कारावयाचे कागदपत्रे**

१ जातीचा दाखला **(सक्षम प्राधिकाऱ्याचा)**

२ आधार कार्ड

३ रेशन कार्ड

४ बँक पासबुक

५ मेंढी पालन करण्याच्या पद्धती व संख्येबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र **(बंधपत्र नमुना क्र. १ नुसार)**

६ अपत्य स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. २ नुसार)**

७ स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. ५)**

८ दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास)

**कार्यान्वयन यंत्रणा :-**

सदर योजनेची अंमलबजावणी व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ गोखलेनगर पुणे यांच्या मार्फत करण्यात येईल.

प्रकल्पांतर्गत आर्थिक निकष :-

| अ.क्र. | तपशील | लाभार्थी संख्या | मंजूर निधी (रु.) |
|---|---|---|---|
| १ | राज्यातील भटक्या जमाती- क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील ज्या मेंढपाळ कुटुंबाकडे किमान २० मेंढया व १ मेंढानर एवढे पशुधन असणाऱ्या कुटुंबांना माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीसाठी प्रतिमाह रु. ६,०००/- असे एकूण २४,०००/- चराई अनुदान वाटप करणे | ३४७० | ८.३३ कोटी |

**योजनेचा कालावधी** :- सदर योजना सन २०२४-२५ पासून राबविण्यात यावी.

**योजनेचे सनियंत्रण व मूल्यमापन** :-

पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती यांनी किमान ५०% लाभार्थींची पडताळणी करावी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी प्रत्येकी किमान १०% लाभार्थींची पडताळणी करावी.

प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (सर्व) यांनी त्यांच्या विभागातील योजनेच्या अंबलबजावणीचा मूल्यमापन अहवाल पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळास वित्तीय वर्ष संपल्यानंतर पुढील तीन महिन्याच्या आत सादर करावा. राज्याचा एकत्रित अहवाल व्यवस्थापकीय संचालक यांनी आयुक्त पशुसंवर्धन यांना सादर करतील. आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी राज्याचा एकत्रीत मूल्यमापन अहवाल त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास सादर करावा.

सदर योजना उपलब्ध निधीस आधीन राहून राबवायची आहे. उपलब्ध तरतुदीपेक्षा अधिकचा खर्च होणार नाही याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी तसेच योजनेअंतर्गत वितरीत करण्यात आलेला निधी कोणत्याही परिस्थितीत अखर्चित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(डॉ. शितलकुमार मुकणे)
**व्यवस्थापकीय संचालक,**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र
मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे

प्रत,

१. मा. अपर मुख्य सचिव (पदु) महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. आयुक्त पशुसंवर्धन,महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ६७ यांना माहितीस्तव सविनय सादर

३. जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)

४.प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व विभाग)

५. सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग (सर्व जिल्हे)

६. प्रक्षेत्र व्यवस्थापक (सर्व प्रक्षेत्रे), पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे

<u>बंधपत्र नमूना क्रमांक – १</u>

## प्रमाणपत्र

(मेंढीपालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत)

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती. ---------------------------------------------------------------------- राहणार -------------------- तालुका ---------------- जिल्हा ------------------ यांचेकडे सध्या -------------- इतक्या मेंढ्या उपलब्ध असल्याचे आज दिनांक ---------------------- रोजी केलेल्या प्रत्यक्ष पडताळणी अंती आढळून आले आहे. तसेच त्यांच्याकडील मेंढ्यांचे संगोपन ----------------------- ( स्थलांतरित / स्थायी) पद्धतीने करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-

डॉ./ श्री.

सहा. आयुक्त पशुसंवर्धन, तालपसचिव --------------/

पविअ, पवैद श्रेणी – १ -----------------------------/-

सहा. पविअ/ प.प, पवैद श्रेणी – २ ----------------/-

<u>बंधपत्र नमूना क्रमांक - २</u>

## अपत्य स्वयंघोषणा पत्र

मी श्री/ श्रीमती (अर्जदाराचे नाव) -------------------------------------------------------------------------------------------

श्री. ( वडिलाचे / पतीचे नाव)--------------------------------------------------------------------------------------------- यांचा

मुलगा/मुलगी/पत्नी वय -------------- वर्ष------------------ रा.------------------------- ता.------------------------

जिल्हा ------------------------------ खालीलप्रमाणे सत्य प्रतिज्ञेवर सांगतो/सांगते की, आणि घोषित करतो/करते की,

1. मी राज्य शासनाच्या राज्यातील भटक्या जमाती- क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीकरिता राबविण्यात येत असलेल्या योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज केला आहे.
2. माझ्या आज हयात असलेल्या अपत्यांची एकूण संख्या ---------------- इतकी आहे. त्यापैकी १ मे २००१ नंतर जन्मलेल्या अपत्यांची संख्या ------------------------- इतकी आहे.
3. दिनांक १ मे २००१ नंतर माझ्या एकूण हयात मुलांच्या संख्येत भर पडून ती दोन पेक्षा जास्त झाल्यास मी उपरोक्त योजनेतील लाभास अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

ठिकाण-----------------------
दिनांक-----------------------

अर्जदाराची सही/ अंगठा

<u>बंधपत्र नमूना क्रमांक – ५</u>

## "स्वयंमघोषणा पत्र"

मी खालील सही करणार, श्री / श्रीमती (अर्जदाराचे नाव) ------------------------------------------------श्री (वडिलाचे / पतीचे नाव) ------------------------------------------------ यांचा मुलगा / मुलगी / पत्नी वय -------वर्ष, रा ---------------- ता --------------- जिल्हा ------------------, मी **"राज्यातील भटक्या जमाती- क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीकरिता राबविण्यात येत असलेल्या राज्य शासनाच्या योजनेचा"** लाभ मिळण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज केलेला आहे. सदर अर्जामध्ये भरलेली माहिती तपासून ती खरी असल्याची खात्री केलेली आहे. तसेच मी अर्जासोबत जोडलेल्या रेशन कार्डनुसार माझे कुटुंबातील एकाच सदस्याने या योजनेअंतर्गत लाभासाठी अर्ज केला आहे. तसेच गेल्या तीन वर्षामध्ये पशुसंवर्धन विषयक कोणत्याही योजनेचा लाभ मी किंवा माझ्या कुटुंबातील व्यक्तींनी घेतलेला नाही, त्याचप्रमाणे मी स्व:ता किंवा माझ्या कुटुंबातील कोणताही सदस्य शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवा निवृत्ती वेतनधारक / शासकीय पदाचा लाभ घेणारा, तसेच राज्य, केंद्र शासन / स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य / पदाधिकारी / लोकप्रतींनिधी नाही. यामध्ये सादर केलेली माहिती खोटी आढळून आल्यास, मी उपरोक्त योजनेचा लाभ घेण्यास अपात्र ठरेन तसेच कायदेशीर कारवाईस पात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची सही/ अंगठा

ठिकाण-----------------------
दिनांक-----------------------

राज्यातील भटक्या जमाती- क या मागास प्रवर्गातील भूमिहीन मेंढपाळ कुटुंबासाठी अर्ध बंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरिता जागा खरेदीसाठी अनुदान स्वरुपात एकवेळचे एकरकमी अर्थसहाय्य देणे या योजनेच्या

## मार्गदर्शक सूचना

प्रती,

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त (सर्व जिल्हे)
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व जिल्हे)

**विषय-** राज्यातील भटक्या जमाती- क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीमधील लाभार्थ्यांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत भूमिहीन मेंढपाळ कुटुंबासाठी अर्ध बंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरिता जागा खरेदीसाठी अनुदान स्वरुपात एकवेळचे एकरकमी अर्थसहाय्य देणे या योजनेच्या अंमलबजावणी बाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेबाबत.

**संदर्भ -** १. शासन निर्णय क्रमांक - पविआ-१०१९/ प्र. क्र. २०२/ पदुम-३ दिनांक- १६/०९/२०१९
२. सन २०२३ च्या हिवाळी अधिवेशनामधील पूरक मागणीनुसार प्राप्त तरतूद.
३. शासन निर्णय क्रमांक - पविआ- २०२३ / प्र. क्र. ४१ / पदु-३ दिनांक १२/०३/२०२४

**जावक क्रमांक** - पुअममेवशेविमपु/तांत्रिक/जागा खरेदी योजना/ मार्गदर्शक सूचना/9009/२०२४, दि.०६/०९/२०२४

राज्यातील भटक्या जमाती-क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीमधील लाभार्थ्यांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत भूमिहीन मेंढपाळ कुटुंबासाठी अर्ध बंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरिता किमान १ गुंठा जागा खरेदी करण्यासाठी, जागेच्या किंमतीच्या ७५% अथवा किमान ३० वर्षासाठी भाडेकरारावर घेण्यासाठी भाड्यापोटी द्यावयाच्या रकमेच्या ७५% रक्कम एकवेळचे एकरकमी अर्थसहाय्य म्हणून कमाल रु. ५०,०००/- एवढे अनुदान वाटप करणे करिता शासन निर्णय क्रमांक पविआ-१०१९/ प्र.क्र.२०२/ पदुम-३ दिनांक- १६/०९/२०१९ अन्वये **"राज्यातील भटक्या जमाती- क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीमधील लाभार्थ्यांना राज्यस्तरीय योजनेंतर्गत भूमिहीन मेंढपाळ कुटुंबासाठी अर्ध बंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरिता जागा खरेदीसाठी अनुदान स्वरुपात एकवेळचे एकरकमी अर्थसहाय्य देणे"** ही योजना राज्यस्तरीय योजनेंतर्गत राबविणेस शासनाची मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच संदर्भीय शासन निर्णय क्रमांक - पविआ- २०२३ / प्र. क्र. ४१ / पदु-३ दिनांक - १२/०३/२०२४ अन्वये लाभार्थी निवड समितीमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

सदर योजना सन २०२४-२५ मध्ये रु. ८.३३ कोटी निधी मंजूर झालेला आहे. सदर निधी मधून राज्यातील ३४ जिल्ह्यामधील २००० लाभधारकांची निवड करून अर्ध बंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरिता किमान १ गुंठा जागा खरेदी करण्यासाठी, जागेच्या किंमतीच्या ७५% अथवा किमान ३० वर्षासाठी भाडेकरारावर घेण्यासाठी भाड्यापोटी द्यावयाच्या रकमेच्या ७५% रक्कम एकवेळचे एकरकमी अर्थसहाय्य म्हणून कमाल रु. ५०,०००/- एवढे अनुदान वाटप करण्याचे प्रस्तावित आहे. सदर योजना अंमलबजावणी बाबतच्या मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

**योजनेचा उद्देश :-**

- ✧ राज्यातील भटकंती करणाऱ्या धनगर व तत्सम समाजातील पशुपालकांना पारंपारिक पद्धतीने करित असलेल्या मेंढी/ शेळी पालन या व्यवसायापासून त्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्त्रोत निर्माण करून देणे व त्याद्वारे त्यांचा सामाजिक व आर्थिक स्तर उंचावण्यास मदत करणे.
- ✧ राज्यामध्ये बंदिस्त शेळी/मेंढी पालन व्यवसायास चालना देणे.
- ✧ मेंढीपालन व्यवसायामध्ये अर्धबंदिस्त किंवा बंदिस्त मेंढीपालन ही संकल्पना प्रभावीपणे राबविणे
- ✧ मेंढीपालनाचा पारंपारिक व्यवसाय असणाऱ्या समाजातील युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे.
- ✧ राज्यामधील शेळयांच्या संख्येमध्ये वाढ करून राज्याच्या कृषी व संलग्न क्षेत्रातील स्थुल उत्पन्न वाढीच्या दराचे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत करणे.
- ✧ स्थायी स्वरूपाच्या ठाणबंद पद्धतीने मेंढीपालन करण्यासाठी पशुपालकांना आकर्षित करून त्यांना स्थैर्य निर्माण करून देणे.
- ✧ राज्यातील मेंढयांच्या संख्येमध्ये सातत्याने होत असलेली घट थांबविणे किंबहुना त्यामध्ये वाढ करून स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.
- ✧ राज्यातील मेंढीपालन व्यवसायास चालना देऊन ग्रामीण रोजगार निर्मिती करणे.

**योजना राबविण्याचे कार्यक्षेत्र :-** सदरची योजना राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरित ३४ जिल्ह्यामध्ये राबविण्यात यावी

**योजनेचे स्वरूप :-**

- ✧ सदर योजना राज्य शासनाने वेळोवेळी अधिसुचित केलेल्या केवळ भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीमधील ज्या मेंढपाळ कुटुंबांच्या **मालकी हक्काची महाराष्ट्र राज्यात कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही प्रकारची शेतजमिन नाही अशा भुमिहीन मेंढपाळ कुटुंबातील कोणत्याही एका सदस्यास (पुरूष किंवा स्त्री) या योजनेचा लाभ देय असेल.**
- ✧ या योजनेमध्ये सन २०२४-२५ या आर्थिक वर्षापासून भुमिहीन मेंढपाळ कुंटुंबासाठी अर्ध बंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरिता किमान १ गुंठा जागा खरेदी करण्यासाठी जागेच्या किंमतीच्या ७५% अथवा किमान ३० वर्षासाठी भाडेकरारावर जागा घेण्यासाठी भाडयापोटी द्यावयाच्या रक्कमेच्या ७५% रक्कम एकवेळेचे एकरकमी अर्थसहाय्य म्हणुन कमाल रु. ५०,०००/- एवढे अनुदान वाटप करणे.
- ✧ सदर योजनेमध्ये ७५% हिस्सा राज्य शासनाचा व २५% हिस्याची रक्कम लाभार्थ्यांने उभारणे आवश्यक आहे.
- ✧ २० मेंढया/शेळया व १ मेंढानर/बोकड एवढे पशुधन संगोपन करण्याकरिता सर्वसाधारणपणे खालीलप्रमाणे जागेची आवश्यकता असते.

➢ **२० + १ मेंढी / शेळी गटासाठी शेड बांधकाम**

I. २१ प्रौढ मेंढया/शेळयांसाठी १० चौ. फुट प्रमाणे २१० चौ. फुट

II. २० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फुट प्रमाणे १०० चौ. फुट

**एकुण बांधकाम ३१० चौ. फुट**

➢ मोकळया जागेस कुंपण उभारणी

I. २१ प्रौढ मेंढया/शेळयांसाठी २० चौ. फुट प्रमाणे ४२० चौ. फुट

II. २० कोकरांसाठी प्रत्येकी ५ चौ. फुट प्रमाणे १०० चौ. फुट

**एकुण ५२० चौ. फुट क्षेत्रास कुंपण**

✧ २० मेंढया / शेळया व १ मेंढानर / बोकड एवढे पशुधन संगोपन करण्याकरिता एकुण शेड बांधकामाकरिता ३१० चौ. फुट व ५२० चौ. फुट क्षेत्रास कुंपण असे एकुण ८३० चौ. फुट जागेची तसेच चाऱ्याची साठवणुक करण्याकरिता लागणारी जागा विचारात घेऊन साधारणपणे १००० चौ. फुट म्हणजेच १ गुंठा जागा पुरेशी आहे.

**लाभार्थी निवडीचे निकष :**

१. सदर योजना राज्य शासनाने वेळोवेळी अधिसुचित केलेल्या केवळ भटक्या जमाती (भज-क) या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीमधील ज्या मेंढपाळ कुटुंबांच्या मालकी हक्काची महाराष्ट्र राज्यात कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही प्रकारची शेतजमिन नाही अशा भुमिहीन मेंढपाळ कुटुंबातील कोणत्याही एका सदस्यास (पुरूष किंवा स्त्री) या योजनेचा लाभ घेता येईल.
२. लाभधारकाचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ६० वर्षापेक्षा जास्त नसावे.
३. लाभधारकांची निवड करताना, महिलांकरिता ३०% व दिव्यांगाकरिता ३% आरक्षण देण्यात यावे.
४. लाभार्थ्यास आधार कार्ड सोबत संलग्न करण्यात यावे.
५. अर्जदार किंवा अर्जदाराच्या कुटुंबातील सदस्य शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवा निवृत्ती वेतनधारक / शासकीय पदाचा लाभ घेणारा, तसेच राज्य, केंद्र शासन / स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य / पदाधिकारी/ लोकप्रतींनिधी नसावा.
६. यापूर्वी पशूपालन संबंधीत योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

**योजना राबविण्याची कार्यपद्धती :-**

१. पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत सदर योजनेस राज्यस्तरीय वृत्तपत्रातून व्यापक प्रसिद्धी देऊन ऑनलाईन अर्ज मागविण्यात येतील.
२. सदर योजनेअंतर्गत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविणे, लाभधारक निवड समितीमार्फत अर्जाची छाननी व निवड करणे या करिता महामंडळामार्फत Web / Android Application उपलब्ध करून देण्यात येईल
३. लाभार्थ्यांची निवड करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली असून, सदर समिती लाभार्थ्यांची निवड करून यादी जाहीर करेल
   - ✧ जिल्हाधिकारी - अध्यक्ष
   - ✧ जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (जिल्हा परिषद) - सदस्य
   - ✧ सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग - सदस्य
   - ✧ जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त - सदस्य सचिव

४ ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेल्या अर्जाची जिल्हास्तरीय निवड समिती मार्फत प्रथम प्राथमिक लाभधारक निवड (Randomization) करण्यात यावी.

प्राथमिक निवड झालेल्या लाभधारकांकडून ऑनलाईन पद्धतीने कागदपत्रे अपलोड करून घ्यावी.

५ प्राथमिक निवड झालेल्या लाभधारकांकडून ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेल्या कागदपत्रांची तपासणी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय स्तरावर करण्यात यावे.

६ जिल्हा निवड समितीमार्फत लाभार्थ्यांची निवड यादी एकास दहा (1 + 10 Waiting) या प्रमाणे अंतिम करून त्यास स्थानिक प्रसिद्धी द्यावी.

७ लाभार्थी निवड समितीमार्फत पात्र अर्जामधून पुढील प्रतीक्षा यादी तयार करून सदरची लाभार्थी यादी पुढील पाच वर्ष ग्राह्य धरण्यात येईल. तसेच शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीस आधीन राहून त्यानुसार दरवर्षी अर्ज मागवून प्रतीक्षा यादी तयार करण्यात येईल.

८ जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी अंतिम निवड करण्यात आलेल्या लाभधारकांना जागा खरेदीकरिता अथवा ३० वर्षासाठी भाडेकरारावर जागा घेणेस कळविण्यात यावे.

९ निवड झालेल्या लाभार्थींनी विकत घेतलेल्या जमिनीचे सक्षम प्राधीकाऱ्याकडे नोंदणी केलेले खरेदीखत (सत्यप्रत) किंवा ३० वर्षासाठी भाडेकरारावर जमिन घेतली असल्यास सक्षम प्राधीकाऱ्याकडे नोंदणी केलेला भाडेकरार (सत्यप्रत), जागेचा Geotagging चा फोटो व बँक खातेचा तपशील इ. माहिती / कागदपत्रे संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांच्या कडे सादर करावे. त्यानुसार जागेची प्रत्यक्ष पडताळणी संबंधित तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी (विस्तार) यांचेमार्फत करून अनुदानाचा प्रस्ताव जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचेमार्फत पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाकडे पाठविण्यात यावा. त्यानंतर शासकीय देय असलेले ७५% अनुदान रु. ५०,०००/- मर्यादेमध्ये महामंडळामार्फत थेट हस्तांतरण पद्धतीने (DBT) लाभधारकांच्या बँक खात्यावर जमा करण्यात यावे.

१० लाभार्थीने सदर योजनेच्या अंबलबजावणी चूक केल्याचे दिसून आल्यास त्या लाभार्थ्याकडून अनुदानाची रक्कम दंडासह वसूल करण्याबाबत विहित महसूल कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात येईल.

११ एखाद्या तालुक्यात लाभार्थींची संख्या किमान लाभार्थी संख्येपेक्षा कमी आढळून आल्यास जिल्हास्तरीय गठीत समितीच्या मान्यतेने उर्वरित लक्षांक इतर तालुक्याकडे वर्ग करण्यात येऊ शकेल.

**लाभार्थी निवडीचे भौतिक उद्धिष्ट :-**

शासन निर्णयानुसार प्रथम टप्प्यात २००० लाभार्थींना अनुदान देण्याचे प्रस्तावित आहे, त्यास अनुसरून *Livestock Population (2012), Govt. of India, Volume II, Chapter 22, Page No. 399, Table No. 27* नुसार राज्यातील जिल्हा निहाय मेंढपाळ कुटुंबांची संख्या विचारात घेऊन तसेच सन २०२४-२५ करिता उपलब्ध निधी रु. ८.३३ कोटी निधी विचारात घेऊन लाभधारक निवडीचे जिल्हानिहाय भौतिक उधीष्ट खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | राज्यातील मेंढपाळ कुटुंबांची संख्या | टक्केवारी % | योजनेचे एकूण भौतिक उद्दिष्ट (लाभधारकांची संख्या) | सन २०२४-२५ करिता मंजूर रु. ८.३३ कोटी मधील भौतिक उद्दिष्टे (लाभधारकांची संख्या) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | नाशिक | 17970 | 18.272 | 365 | 304 |
| 2 | पुणे | 13674 | 13.904 | 278 | 231 |
| 3 | सातारा | 10702 | 10.882 | 217 | 181 |
| 4 | अहमदनगर | 9121 | 9.274 | 185 | 154 |
| 5 | सांगली | 7787 | 7.918 | 158 | 131 |
| 6 | सोलापूर | 6588 | 6.699 | 133 | 111 |
| 7 | धुळे | 5549 | 5.642 | 112 | 93 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | कोल्हापूर | 3952 | 4.018 | 80 | 66 |
| 9 | औरंगाबाद | 3395 | 3.452 | 69 | 57 |
| 10 | बीड | 2712 | 2.758 | 55 | 45 |
| 11 | बुलढाणा | 2206 | 2.243 | 45 | 37 |
| 12 | उस्मानाबाद | 2053 | 2.087 | 41 | 34 |
| 13 | जळगाव | 2038 | 2.072 | 41 | 34 |
| 14 | जालना | 1314 | 1.336 | 26 | 22 |
| 15 | नांदेड | 1159 | 1.178 | 23 | 19 |
| 16 | चंद्रपूर | 1077 | 1.095 | 21 | 18 |
| 17 | यवतमाळ | 1071 | 1.089 | 21 | 18 |
| 18 | लातुर | 1027 | 1.044 | 20 | 17 |
| 19 | परभणी | 1025 | 1.042 | 20 | 17 |
| 20 | अमरावती | 819 | 0.833 | 16 | 13 |
| 21 | गोंदीया | 450 | 0.458 | 9 | 7 |
| 22 | नागपूर | 437 | 0.444 | 8 | 7 |
| 23 | नंदुरबार | 407 | 0.414 | 8 | 6 |
| 24 | गडचिरोली | 389 | 0.396 | 7 | 6 |
| 25 | अकोला | 267 | 0.271 | 5 | 4 |
| 26 | ठाणे | 236 | 0.240 | 5 | 4 |
| 27 | पालघर | 236 | 0.240 | 4 | 4 |
| 28 | हिंगोली | 216 | 0.220 | 4 | 4 |
| 29 | वर्धा | 132 | 0.134 | 4 | 4 |
| 30 | वाशिम | 126 | 0.128 | 4 | 4 |
| 31 | भंडारा | 115 | 0.117 | 4 | 4 |
| 32 | रायगड | 82 | 0.083 | 4 | 4 |
| 33 | रत्नागिरी | 15 | 0.015 | 4 | 3 |
| 34 | सिंधुदुर्ग | 2 | 0.002 | 4 | 3 |
| | एकुण | **98349** | **100.000** | **2000** | **1666** |

**प्राथमिक निवड झाल्यानंतर सादर करावयाचे कागदपत्रे**

१ अर्जदार स्वत:च्या तसेच त्याच्या कुटुंबाच्या इतर सदस्याच्या नावाने जमीन नसल्याबाबत सक्षम प्राधीकाऱ्याचे प्रमाणपत्र (भूमिहीन प्रमाणपत्र)

२ जातीचा दाखला **(सक्षम प्राधिकाऱ्याचा)**

३ आधार कार्ड

४ रेशन कार्ड

५ बँक पासबुक

६ मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र **(बंधपत्र नमुना क्र. १ नुसार)**

७ अपत्य स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. २ नुसार)**

८ स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. ५)**

९ दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास)

**कार्यान्वयन यंत्रणा :-**

सदर योजनेची अंमलबजावणी व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ गोखलेनगर पुणे यांचे मार्फत करण्यात येईल.

**प्रकल्पांतर्गत आर्थिक निकष :-**

| अ.क्र. | तपशील | लाभार्थी संख्या | एकूण निधी (रु.) |
|---|---|---|---|
| १ | राज्यस्तरीय योजनेंतर्गत भूमिहीन मेंढपाळ कुटुंबासाठी अर्ध बंदिस्त, बंदिस्त मेंढीपालन करण्याकरिता किमान १ गुंठा जागा खरेदी करण्यासाठी, जागेच्या किंमतीच्या ७५% अथवा किमान ३० वर्षासाठी भाडेकरारावर घेण्यासाठी भाड्यापोटी द्यावयाच्या रकमेच्या ७५% रक्कम एकवेळचे एकरकमी अर्थसहाय्य म्हणून कमाल रु. ५०,०००/- एवढे अनुदान वाटप करणे | १६६६ | ८.३३ कोटी |

**योजनेचा कालावधी :-** सदर योजना सन २०२४-२५ पासून राबविण्यात यावी

**योजनेचे सनियंत्रण व मूल्यमापन :-**

पशुधन विकास अधिकारी (विस्तार) पंचायत समिती यांनी किमान ५०% लाभार्थींची पडताळणी करावी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांनी प्रत्येकी किमान १०% लाभार्थींची पडताळणी करावी.

प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (सर्व) यांनी त्यांच्या विभागातील योजनेच्या अंबलबजावणीचा मूल्यमापन अहवाल पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळास वित्तीय वर्ष संपल्यानंतर पुढील तीन महिन्याच्या आत सादर करावा. राज्याचा एकत्रित अहवाल व्यवस्थापकीय संचालक यांनी आयुक्त पशुसंवर्धन यांना सादर करतील. आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी राज्याचा एकत्रीत मूल्यमापन अहवाल त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास सादर करावा.

सदर योजना उपलब्ध निधीस आधीन राहून राबवायची आहे. उपलब्ध तरतुदीपेक्षा अधिकचा खर्च होणार नाही याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी तसेच योजनेअंतर्गत वितरीत करण्यात आलेला निधी कोणत्याही परिस्थितीत अखर्चित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

(डॉ. शितलकुमार मुकणे)
**व्यवस्थापकीय संचालक,**
पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र
मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे

प्रत,

१. मा. अपर मुख्य सचिव (पदु) महाराष्ट्र शासन, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. आयुक्त पशुसंवर्धन,महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे - ६७ यांना माहितीस्तव सविनय सादर

३. जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)

४.प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व विभाग)

५. सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग (सर्व जिल्हे)

६. प्रक्षेत्र व्यवस्थापक (सर्व प्रक्षेत्रे), पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे

बंधपत्र नमूना क्रमांक – १

## प्रमाणपत्र

(मेंढी पालन करण्याच्या पद्धती व मेंढ्यांच्या संख्येबाबत)

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती. ------------------------------------------------------------- राहणार ------------------- तालुका --------------- जिल्हा ----------------- यांचेकडे सध्या ------------- इतक्या मेंढ्या उपलब्ध असल्याचे आज दिनांक --------------------- रोजी केलेल्या प्रत्यक्ष पडताळणी अंती आढळून आले आहे. तसेच त्यांच्याकडील मेंढ्यांचे संगोपन ---------------------- ( स्थलांतरित / स्थायी) पद्धतीने करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-

डॉ./ श्री.

सहा. आयुक्त पशुसंवर्धन, तालपसचिव -------------/

पविअ, पवैद श्रेणी – १ ----------------------------/-

सहा. पविअ/ प.प, पवैद श्रेणी – २ ---------------/-

बंधपत्र नमूना क्रमांक - २

## अपत्य स्वयंघोषणा पत्र

मी श्री/ श्रीमती (अर्जदाराचे नाव) ---------------------------------------------------------------------------------

श्री. ( वडिलाचे / पतीचे नाव)------------------------------------------------------------------------------------- यांचा

मुलगा/मुलगी/पत्नी वय -------------- वर्ष------------------ रा.------------------------- ता.------------------------

जिल्हा ----------------------------- खालीलप्रमाणे सत्य प्रतिज्ञेवर सांगतो/सांगते की, आणि घोषित करतो/करते की,

1. मी राज्य शासनाच्या राज्यातील भटक्या जमाती- क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीकरिता राबविण्यात येत असलेल्या योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज केला आहे.
2. माझ्या आज हयात असलेल्या अपत्यांची एकुण संख्या ---------------- इतकी आहे. त्यापैकी १ मे २००१ नंतर जन्मलेल्या अपत्यांची संख्या ------------------------- इतकी आहे.
3. दिनांक १ मे २००१ नंतर माझ्या एकूण हयात मुलांच्या संख्येत भर पडून ती दोन पेक्षा जास्त झाल्यास मी उपरोक्त योजनेतील लाभास अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

ठिकाण-----------------------
दिनांक-----------------------

अर्जदाराची सही/ अंगठा

<u>बंधपत्र नमूना क्रमांक – ५</u>

## "स्वयंमघोषणा पत्र"

मी खालील सही करणार, श्री / श्रीमती (अर्जदाराचे नाव) ------------------------------------------------------ श्री (वडिलाचे / पतीचे नाव) ---------------------------------------------------- यांचा मुलगा / मुलगी / पत्नी वय ------- वर्ष, रा ---------------- ता --------------- जिल्हा ------------------, मी **"राज्यातील भटक्या जमाती- क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीकरिता राबविण्यात येत असलेल्या राज्य शासनाच्या योजनेचा"** लाभ मिळण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज केलेला आहे. सदर अर्जामध्ये भरलेली माहिती तपासून ती खरी असल्याची खात्री केलेली आहे. तसेच मी अर्जासोबत जोडलेल्या रेशन कार्डनुसार माझे कुटुंबातील एकाच सदस्याने या योजनेअंतर्गत लाभासाठी अर्ज केला आहे. तसेच गेल्या तीन वर्षामध्ये पशुसंवर्धन विषयक कोणत्याही योजनेचा लाभ मी किंवा माझ्या कुटुंबातील व्यक्तींनी घेतलेला नाही, त्याचप्रमाणे मी स्व:ता किंवा माझ्या कुटुंबातील कोणताही सदस्य शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवा निवृत्ती वेतनधारक / शासकीय पदाचा लाभ घेणारा, तसेच राज्य, केंद्र शासन / स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य / पदाधिकारी / लोकप्रतींनिधी नाही. यामध्ये सादर केलेली माहिती खोटी आढळून आल्यास, मी उपरोक्त योजनेचा लाभ घेण्यास अपात्र ठरेन तसेच कायदेशीर कारवाईस पात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची सही/ अंगठा

ठिकाण-----------------------
दिनांक-----------------------

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-६७
COMMISSIONERATE OF ANIMAL HUSBANDRY
स्पायसर मेमोरिअल कॉलेज समोर, औंध पुणे ४११ ०६७
Maharashtra State, Opposite Spicer Memorial College, Aundh Pune ४११०६७
E-Mail : cah.livestockandpoultry@gmail.com Telephone No.-020-25690480, 25690481, 25690485
"पशुधनाच्या आजारावर घरपोच उपचार, एका कॉलच्या अंतरावर: संपर्क टोल फ्री क्रमांक-१९६२"

जा. क्र. कुक्कुट -२ / प्र.क्र.१०७ /९३८६-९४६४/ २०२४/ पसं १३, पुणे-६७ दिनांक ०६/९/२०२४

## मार्गदर्शक सूचना

प्रती,

१. प्रादेशिक पशुसंवर्धन सह आयुक्त (सर्व)
२. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व)
३. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व)

विषय – ग्रामीण परसातील कुक्कुट पालन संकल्पने अंतर्गत भटक्या जमाती-क या प्रवर्गासाठी धनगर व तत्सम जमाती साठी ७५% अनुदानावर चार आठवडे वयाच्या सुधारित देशी प्रजातीच्या १०० कुक्कुट पक्ष्यांच्या खरेदी व संगोपन साठी अर्थसहाय्य या योजनेच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे बाबत **सन २०२४-२५**

संदर्भ: १. शासन निर्णय क्र कुक्कुट -२०१९/प्र.क्र.९३/पदुम-४, मंत्रालय, मुंबई -३२ दि.१६/०९/२०१९
२. शासन निर्णय क्र कुक्कुट-२०१९/प्र.क्र.९३/पदुम-४, मंत्रालय, मुंबई -३२ दि.१८/११/२०१९
३. जा. क्र. कुक्कुट -२ / प्र.क्र.१०७ /६५६-७७५/२०१९ / पसं १३, पुणे-६७ दिनांक १०/१/२०२४
४. जा. क्र. कुक्कुट -२ / प्र.क्र.१०७ /९३०६-८३/२०१९ / पसं १३, पुणे-६७ दिनांक ०६/०९/२०२४

उपरोक्त संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयानुसार ग्रामीण परसातील कुक्कुट पालन संकल्पने अंतर्गत भटक्या जमाती -क या प्रवर्गातील धनगर व तस्तम जमातीसाठी ७५% अनुदानावर चार आठवडे वयाच्या सुधारित देशी प्रजातीच्या १०० कुक्कुट पक्ष्यांच्या खरेदी व संगोपना साठी अर्थसहाय्य या योजनेस प्रशासकीय मंजुरी प्राप्त आहे. सदर योजनेसाठी सन २०२४-२५ वर्षामध्ये रु. ३.३३ कोटी निधीची अर्थ संकल्पीय तरतूद मंजूर करण्यात आलेली आहे. शासनाने या योजने संदर्भात वरील संदर्भिय शासन निर्णयामध्ये नमूद केलेले मंजूर आर्थिक निकष, सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना, अटी व शर्ती यानुसार योजना राबविण्यात यावी.

भटक्या जमाती- क या प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीमधील लाभार्थ्यांना लाभ देण्याकरीता ग्रामीण भागात परसातील कुक्कुटपालनाच्या माध्यमातून अंडी व मांस उत्पादनात वाढ घडवून आणणे, उच्चतम पोषणमुल्य असलेल्या अंड्याचा मानवी आहारात जास्तीत जास्त समावेश करणे, कुक्कुट मास उत्पादन वाढविणे व भटक्या जमाती - क या प्रवर्गातील बेरोजगारांना आर्थिक विकासाची संधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने **सन २०२४-२५** साठी आवश्यक त्या सविस्तर मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

**योजनेचा उद्देश :**

१) उक्त समाजातील बेरोजगारांना आर्थिक विकासाची संधी उपलब्ध करून स्थैर्य निर्माण करून देणे व त्याद्वारे जीवनमान उंचावणे.

२) परसातील कुक्कुट पालनच्या माध्यमातून उच्चतम पोषण मुल्ये असणाऱ्या अंडी व मांस यांचा मानवी आहारात जास्तीत जास्त समावेश करून कुक्कुट मांस उत्पादन वाढविणे.

३) सघन पद्धतीने परसातील कुक्कुट पालन व्यवसाय अमलात आणणे.

**योजनेची वैशिष्टे –**

राज्याच्या ग्रामीण भागात कुक्कुट पालन हा पूरक व्यवसाय न राहता अर्थार्जनाचा स्वतंत्र स्त्रोत म्हणून पुढे येत आहे. पारंपारिक कुक्कुट पालन पद्धतीला तंत्रज्ञानाची जोड देणे, लाभार्थीचे कौशल्य विकास करणे, पक्षी व्यवस्थापनामध्ये सुधारणा करणे व त्यानुसार आर्थिक स्थैर्य मिळवणे यास्तव राज्यातील ३४ जल्ह्यातील भटक्या जमाती- क या प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीच्या लाभार्थ्यांना लाभ देणे करिता हि योजना प्रस्तावित करण्यात आली आहे.

**योजना राबविण्याचे कार्यक्षेत्र :**

सदर योजना राज्यातील मुंबई व मुंबई उपनगर वगळता उर्वरित ३४ जिल्ह्यांमधील **महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद, नगर पंचायत व कटक मंडळे वगळून** इतर भागात राबविण्यात यावी.

**लाभार्थी निवडीचे निकष :-**

१. लाभार्थी हा भटक्या जमाती (क) या धनगर व तत्सम जमाती प्रवर्गातील जात प्रमाणपत्र धारण करणारा व १८ ते ६० या वयोगटातील असावा.
२. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीस या योजनेचा लाभ देण्यात यावा.
३. परसातील कुक्कुटपालनासाठी निवडलेल्या लाभार्थ्याकडे स्वतःची पुरेशी जागा असावी.
४. लाभार्थी निवडताना भटक्या जमाती - क या प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीतील ३० टक्के महिला व ३ टक्के दिव्यांग लाभार्थ्यांना या योजनेअंतर्गत प्राधान्य देण्यात यावे.
५. व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी महामंडळ यांनी सदर योजनेचे सनियंत्रण करावे व योजनेची प्रसिद्धी करावी.
६. अर्जदार किंवा अर्जदाराच्या कुटुंबातील सदस्य शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवा निवृत्ती वेतनधारक / शासकीय पदाचा लाभ घेणारा, तसेच राज्य, केंद्र शासन / स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य / पदाधिकारी/ लोकप्रतींनिधी नसावा.

**लाभधारक निवडीची कार्यपद्धती :-**

१. पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत सदर योजनेस राज्यस्तरीय वृत्तपत्रातून व्यापक प्रसिद्धी देऊन ऑनलाईन अर्ज मागविण्यात येतील
२. पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत सदर योजनेस राज्यस्तरीय वृत्तपत्रातून व्यापक प्रसिद्धी देऊन ऑनलाईन अर्ज मागविण्यात येतील
३. लाभार्थ्यांची निवड व योजनेचे सनियंत्रण करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली असून, सदर समिती लाभार्थ्यांची निवड करून यादी जाहीर करेल,

| | |
|---|---|
| १. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त | अध्यक्ष |
| २. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ३. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण (राज्यस्तर) | सदस्य |
| ४. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (मध्यवर्ती अडी उबवणी केंद्र) अथवा, पशुधन विकास अधिकारी, सघन कुक्कुट विकास प्रकल्प | सदस्य |

उपलब्ध असल्यास यापैकी एक

५. पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती
(जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यानी नामनिर्देशित करावे): सदस्य

६. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन (जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय) सदस्य सचिव

७. ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेल्या अर्जाची जिल्हास्तरीय निवड समिती मार्फत प्रथम प्राथमिक लाभधारक निवड (Randomization) करण्यात यावी.

८. प्राथमिक निवड (Randomization) झालेल्या लाभधारकांकडून ऑनलाईन पद्धतीने कागदपत्रे अपलोड करून घ्यावी.

९. प्राथमिक निवड झालेल्या लाभधारकांकडून ऑनलाईन पद्धतीने प्राप्त झालेल्या कागदपत्रांची तपासणी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय स्तरावर करण्यात येईल.

१०. जिल्हा निवड समितीमार्फत लाभार्थ्यांची निवड यादी एकास दहा (१ + १० Waiting) या प्रमाणे अंतिम करून त्यास स्थानिक प्रसिद्धी द्यावी.

११. लाभार्थी निवड समितीमार्फत पात्र अर्जामधून पुढील प्रतीक्षा यादी तयार करून सदरची लाभार्थी यादी पुढील पाच वर्ष ग्राह्य धरण्यात येईल. तसेच शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीस आधीन राहून त्यानुसार दरवर्षी अर्ज मागवून प्रतीक्षा यादी तयार करण्यात यावी.

**प्राथमिक निवड झाल्यानंतर सादर कारावयाचे कागदपत्रे**

१) जातीचा दाखला **(सक्षम प्राधिकाऱ्याचा)**

२) आधार कार्ड

३) रेशन कार्ड

४) बँक पासबुक

५) परसातील कुक्कुटपालनासाठी अर्जदाराकडे स्वतःची पुरेशी जागा असल्याबाबत संबंधित पशुवैद्यकीय दवाखान्याचे पशुधन विकास अधिकारी यांचे प्रमाणपत्र **(बंधपत्र नमुना क्र. ६ नुसार)**

६) अपत्य स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. २ नुसार)**

७) स्वयंघोषणा पत्र **(बंधपत्र नमुना क्र. ५)**

८) दिव्यांग प्रमाणपत्र (लागू असल्यास)

**जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीची कार्ये :-**

१. तालुकानिहाय लक्षांक निश्चित करुन, प्राप्त पात्र अर्जातून ऑनलाईन पध्दतीने लाभार्थी निवड प्रक्रिया पूर्ण करण्यात यावी.

२. योजनेअंतर्गत लाभार्थीची निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तालुकास्तरावर एकदिवसीय कुक्कुट प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात यावे. प्रशिक्षण वर्गासाठी कुठल्याही स्वरुपाची आर्थिक तरतूद उपलब्ध करुन दिली जाणार नाही.

३. लाभार्थीच्या एकदिवसीय प्रशिक्षणासाठी तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी याच्या सेवा उपयोगात आणाव्यात.

४. लाभार्थ्याने प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर स्वखर्चाने पक्ष्यासाठी निवारा उभारावयाचा आहे. लाभार्थ्याने पक्ष्यासाठी निवारा, कुक्कुट खाद्य व प्रत्यक्ष पक्ष्याची खरेदी केल्याची खातरजमा स्थानिक संस्थाप्रमुख व पशुधन विकास

अधिकारी (विस्तार) यांनी सयुक्तरित्या करून, तसा अहवाल जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त याच्याकडे सादर केल्यानतरच जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त देय अनुदान डीबीटीद्वारे (थेट लाभ हस्तांतरण पद्धतीने) लाभार्थ्याच्या बँक खात्यात वर्ग करतील.

५. एखादया तालुक्यात लाभार्थीची संख्या किमान लाभार्थी संख्येपेक्षा कमी आढळून आल्यास, जिल्हास्तरीय सनियंत्रन समितीच्या मान्यतेने उर्वरित लक्षांक इतर तालुक्याकडे वर्ग करण्यात येऊ शकेल.

६. एखाद्या जिल्ह्यात लाभार्थ्यांची संख्या किमान लाभार्थी संख्येपेक्षा कमी आढळून आल्यास, आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांच्या मान्यतेने उर्वरित लक्ष्याक इतर जिल्ह्याकडे वर्ग करता येऊ शकेल.

**कार्यान्वयण यंत्रणा :-**

सदर योजनेचे अमलबजावणी अधिकारी तसेच, आहरण व सवितरण अधिकारी सबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त हे राहतील. विभागीय स्तरावर संबंधित प्रादेशिक सहआयुक्त पशुसवर्धन व राज्याकरिता आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांच्या वतीने व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी महामंडळ हे सनियंत्रण अधिकारी राहतील.

**प्रकल्पांतर्गत विविध घटक व आर्थिक निकष :**

सदर योजने अंतर्गत भटक्या जमाती (क) या प्रवर्गासाठी धनगर व तस्तम जमाती साठी ७५% अनुदानावर चार आठवडे वयाच्या सुधारित देशी प्रजातीच्या १०० कुक्कुट पक्ष्यांच्या खरेदी व संगोपना साठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

| अनु. क्र. | तपशील | संख्या | खर्च (रु) |
|---|---|---|---|
| १ | ४ आठवडे वयाच्या सुधारित देशी प्रजातीच्या पक्ष्यांची खरेदी किंमत (प्रती पक्षी रु. ६०/-प्रमाणे) | १०० | रु. ६०००/- |
| २ | दोन महिन्याचे कुक्कुट पक्षी खाद्य (प्रती पक्षी २ कि. ग्राम या प्रमाणात) दर रु. ३०/- प्रती किलो | २०० कि. ग्राम | रु. ६०००/- |
| | | एकूण प्रकल्प किंमत | रु. १२,०००/- |
| | | लाभार्थी हिस्सा (२५%) | रु. ३०००/- |
| | | शासन अनुदान (७५%) | रु, ९०००/- |

**योजनेचा कालावधी :** सन २०२३-२४ पासून राबविण्यात यावी.

**आर्थिक व भौतिक उद्दिष्टे** - याकरिता **सन २०२४-२५ साठी** प्रति जिल्हा खालील प्रमाणे लक्षांक देण्यात येत आहे.

| अ. क्र. | जिल्हा | एकूण लक्षांक गट | सन २०२४-२५ करिता अर्थसंकल्पि तरतुदीत नुसार आर्थिक लक्षांक | सन २०२४-२५ करिता अर्थसंकल्पित तरतुदी नुसार नुसार भौतिक लक्षांक |
|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | १००० | ९७२००० | १०८ |
| २ | पालघर | १००० | ९७२००० | १०८ |
| ३ | रायगड | १००० | ९७२००० | १०८ |
| ४ | रत्नागिरी | १००० | ९७२००० | १०८ |
| ५ | सिंधुदुर्ग | १००० | ९७२००० | १०८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **एकूण मुंबई** | | **५०००** | **४८६००००** | **५४०** |
| ६ | पुणे | १००० | १०९८००० | १२२ |
| ७ | सातारा | १००० | ९७२००० | १०८ |
| ८ | सांगली | १००० | ९७२००० | १०८ |
| ९ | सोलापूर | १००० | ९७२००० | १०८ |
| १० | कोल्हापूर | १००० | ९७२००० | १०८ |
| **एकूण पुणे** | | **५०००** | **४९८६०००** | **५५४** |
| ११ | नाशिक | १००० | १०९८००० | १२२ |
| १२ | धुळे | १००० | ९७२००० | १०८ |
| १३ | नंदुरबार | १००० | ९७२००० | १०८ |
| १४ | जळगाव | १००० | ९७२००० | १०८ |
| १५ | अहमदनगर | १००० | ९७२००० | १०८ |
| **एकूण नाशिक** | | **५०००** | **४९८६०००** | **५५४** |
| १६ | अमरावती | १००० | ९७२००० | १०८ |
| १७ | यवतमाळ | १००० | ९७२००० | १०८ |
| १८ | बुलढाणा | १००० | ९७२००० | १०८ |
| १९ | अकोला | १००० | ९७२००० | १०८ |
| २० | वाशीम | १००० | ९७२००० | १०८ |
| **एकूण अमरावती** | | **५०००** | **४८६००००** | **५४०** |
| २१ | नागपूर | १००० | ९७२००० | १०८ |
| २२ | भंडारा | १००० | ९७२००० | १०८ |
| २३ | वर्धा | १००० | ९७२००० | १०८ |
| २४ | गोंदिया | १००० | ९७२००० | १०८ |
| २५ | चंद्रपूर | १००० | ९७२००० | १०८ |
| २६ | गडचिरोली | १००० | ९७२००० | १०८ |
| **एकूण नागपूर** | | **६०००** | **५८३२०००** | **६४८** |
| २७ | छ. संभाजी नगर | १००० | ९७२००० | १०८ |
| २८ | जालना | १००० | ९७२००० | १०८ |
| २९ | परभणी | १००० | ९७२००० | १०८ |
| ३० | बीड | १००० | ९७२००० | १०८ |
| **एकूण छ. संभाजी नगर** | | **४०००** | **३८८८०००** | **४३२** |
| ३१ | लातूर | १००० | ९७२००० | १०८ |
| ३२ | धाराशिव | १००० | ९७२००० | १०८ |
| ३३ | नांदेड | १००० | ९७२००० | १०८ |
| ३४ | हिंगोली | १००० | ९७२००० | १०८ |
| **एकूण लातूर** | | **४०००** | **३८८८०००** | **४३२** |
| **एकूण महाराष्ट्र** | | **३४०००** | **३३३०००००** | **३७००** |

**योजनेचे सनियंत्रण आणि मुल्यमापन :-**

ज्या पशुवैद्यकीय संस्थेच्या कार्यक्षेत्रात सदरची योजना राबविली जाईल, त्या संस्थेच्या प्रमुखाने सदर योजनेचा १०० टक्के पाठपुरावा करावा. तसेच, रोगप्रतिबंधक लसीकरण आणि इतर बाबींसाठी लाभार्थ्यांना मार्गदर्शन करावे, पशुधन विकास अधिकारी (विस्तार), पंचायत समिती यांनी किमान ५० टक्के गटांची पडताळणी करावी. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यानी प्रत्येकी किमान १० टक्के गटांची पडताळणी करावी.

प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन (सर्व) यानी त्याच्या विभागातील योजनेच्या अमलबजावणीचा मुल्यमापन अहवाल आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांना वित्तीय वर्ष संपल्यावर पुढील तीन महिन्याच्या आत सादर करावा. आयुक्त पशुसंवर्धन, पुणे यांनी राज्याचा एकत्रित मुल्यमापन अहवाल त्यांच्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास सादर करावा.

**योजनेचा वित्तीय भार-**

आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीसाठी सुरु असलेल्या योजनांच्या धर्तीवर भटक्या जमाती (क) या प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीच्या विकासासाठी विशेष कार्यक्रम राबविणे या अंतर्गत विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग प्रवर्ग कल्याण विभागाने सन २०२४-२५ मध्ये अर्थसंकल्पीत केलेल्या निधीमधून या योजनेसाठी निधी उपलब्ध होणार आहे.

योजनेसाठी लेखाशीर्ष :-
मागणी क्र. झेड जी -३
इतर मागास बहुजन कल्याण विभाग
४८१, जनजाती क्षेत्र उपयोजना
१०२ आर्थिक विकास
(०४) भटक्या जमत - क यांचे कल्याण
(०४) (०६) १०० कुक्कुट पक्ष्यांच्या खरेदी व संगोपनासाठी ७५% अनुदान (कार्यक्रम)
(२२२५ एफ८१७)
३३-अर्थसहाय्य

सदर योजना उपलब्ध निधीस अधिन राहून राबवावयाची आहे. उपलब्ध तरतुदीपेक्षा अधिकचा खर्च होणार नाही याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी. तसेच योजनेअंतर्गत वितरीत करण्यात आलेला निधी कोणत्याही परिस्थितीत अखर्चीत राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

सहपत्र - वरीलप्रमाणे

स्वाक्षरीत -
(डॉ. प्रवीणकुमार देवरे, भा.प्र.से.)
आयुक्त पशुसंवर्धन
महाराष्ट्र राज्य, पुणे-६७

प्रत : १) मा. अपर मुख्य सचिव, (पदुम) महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१) व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी महामंडळ, पुणे
२) प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, (सर्व).
३) कार्यासन अधिकारी पसं - ६ यांना माहितीसाठी.

**बंधपत्र नमूना क्रमांक – ६**

परसबागेतील कुक्कुटपालनासाठी पुरेशी जागा असल्याबाबतचे
**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती. ---------------------------------------------------------------- ------- राहणार -------------------- तालुका ---------------- जिल्हा ------------------ यांचेकडे परसबागेतील कुक्कुटपालनासाठी पुरेशी जागा उपलब्ध असल्याचे आज दिनांक ---------------------- रोजी केलेल्या प्रत्यक्ष पडताळणी अंती आढळून आले आहे.

स्वाक्षरी/-

डॉ./ श्री.

सहा. आयुक्त पशुसंवर्धन, तालपसचिव --------------/
पविअ, पवैद श्रेणी § १ -----------------------------/-
सहा. पविअ/ प.प, पवैद श्रेणी § २ ----------------/-

<u>बंधपत्र नमूना क्रमांक - २</u>

## <u>अपत्य स्वयंघोषणा पत्र</u>

मी श्री/ श्रीमती (अर्जदाराचे नाव) ----------------------------------------------------------------------------

-------------

श्री. ( वडिलाचे / पतीचे नाव)------------------------------------------------------------------------

-------------- यांचा मुलगा/मुलगी/पत्नी वय -------------- वर्ष----------------- रा.------------------

------ ता.-----------------------जिल्हा ---------------------------- खालीलप्रमाणे सत्य प्रतिज्ञेवर सांगतो/सांगते की, आणि घोषित करतो/करते की,

१. मी राज्य शासनाच्या राज्यातील भटक्या जमाती- क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीकरिता राबविण्यात येत असलेल्या योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

२. माझ्या आज हयात असलेल्या अपत्यांची एकूण संख्या ---------------- इतकी आहे. त्यापैकी १ मे २००१ नंतर जन्मलेल्या अपत्यांची संख्या ------------------------- इतकी आहे.

३. दिनांक १ मे २००१ नंतर माझ्या एकूण हयात मुलांच्या संख्येत भर पडून ती दोन पेक्षा जास्त झाल्यास मी उपरोक्त योजनेतील लाभास अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

ठिकाण-----------------------
दिनांक----------------------

**अर्जदाराची सही/ अंगठा**

<u>बंधपत्र नमूना क्रमांक § ५</u>

## "स्वयंघोषणा पत्र"

मी खालील सही करणार, श्री / श्रीमती (अर्जदाराचे नाव) ------------------------------------------ -------श्री (वडिलाचे / पतीचे नाव) ------------------------------------------------ यांचा मुलगा / मुलगी / पत्नी वय --------वर्ष, रा ---------------- ता --------------- जिल्हा -----------------, मी **"राज्यातील भटक्या जमाती- क या मागास प्रवर्गातील धनगर व तत्सम जमातीकरिता राबविण्यात येत असलेल्या राज्य शासनाच्या योजनेचा"** लाभ मिळण्यासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज केलेला आहे. सदर अर्जामध्ये भरलेली माहिती तपासून ती खरी असल्याची खात्री केलेली आहे. तसेच मी अर्जासोबत जोडलेल्या रेशन कार्डनुसार माझे कुटुंबातील एकाच सदस्याने या योजनेअंतर्गत लाभासाठी अर्ज केला आहे. तसेच गेल्या तीन वर्षामध्ये पशुसंवर्धन विषयक कोणत्याही योजनेचा लाभ मी किंवा माझ्या कुटुंबातील व्यक्तींनी घेतलेला नाही, त्याचप्रमाणे मी स्व:ता किंवा माझ्या कुटुंबातील कोणताही सदस्य शासकीय / निमशासकीय / स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सेवेत किंवा सेवा निवृत्ती वेतनधारक / शासकीय पदाचा लाभ घेणारा, तसेच राज्य, केंद्र शासन / स्थानिक स्वराज्य संस्थेचे सदस्य / पदाधिकारी / लोकप्रतींनिधी नाही. यामध्ये सादर केलेली माहिती खोटी आढळून आल्यास, मी उपरोक्त योजनेचा लाभ घेण्यास अपात्र ठरेन तसेच कायदेशीर कारवाईस पात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची सही/ अंगठा

ठिकाण-------------------------

दिनांक-------------------------